# वेळेचें महत्व.

" I slept and found that life is beauty,
I woke and found that life is duty !!! "

आर्या.

मी झोंप घेत असतां मज्जीवित धन्य वाटलें प्रियसें
जागृत होतां कळलें कर्तव्यावीण त्यांत राम नसे !

हा

लहानसा निबंध

**एकनाथ गणेश भांडारे,**

ह्यांनीं लिहिला

तो

मुंबई येथें

" तत्त्वविवेचक " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

आगष्ट १९०७

संबंधी सर्व प्रकारचे हक्क निबंधकारानें आपल्याकडे राखून ठेविले आहेत.

किंमत चार आणे.

# अर्पणपत्रिका.

माझे प्रियमित्र श्रीयुत रा. रा. गणपतराव भिवाजी (जी. बी. नाईक, ) यांसः—

प्रेमपूर्वक विनंति विशेषः—

आर्या.

मानससरोवरींच्या, हंसा! हें ताट घे भरुनि मोतीं!
न गणीं लहान मोठीं, पाणी निरखी, प्रयत्न मम होती १
त्वल्लालसेस वश मीं, होउनियां प्रार्थिलें कलीकाला!
हृद्गत सांग तुझें मज, जेणें उमजे तुझी मनुज लीला! २
मज त्याणें मग दाविलि, संपत्ती गुप्त आपुली विपुल!
गेले नेत्र दिपूनी, बघतां ती, तत्स्वरूप तें विमल! ३
द्रवली परि ती चित्तीं, आणि दिलें ताट भरुनि मज बा! हें!
मीं तेंच आर्पि तुजला, स्वीकारीं मन्मती तुला वाहे! ४
ह्या मुक्तसरांपैकीं, एकहि सर मौल्यवान् नसे सुबक-
म्हणतिल म्हणोत कोणी; स्वीकारी मात्र आज हें तबक! ५
उपयोग मुलांबाळां, ह्यांचा होईल जेधवां होवो
परि तद्यशपय तुजला, पूर्णपणें आजपासुनी न्हावो! ६
युष्यरत्न वसवी, ऐसें सत्कीर्तिकोंदणीं ललिं!
तुझा सहज मग, सुरवर करतील चित्ति बा! काले! ७

आपला नम्र,

एकनाथ गणेश भांडारे,

३५८
निबंध

# प्रस्तावना.

प्रकृत निबंधाचे उपक्रमांत म्हटल्याप्रमाणें सद्यस्थिती अशी आहे कीं, कोणीही आळसानें जांभया देत स्वस्थ बसतां उपयोगीं नाहीं. Nothing is so injurious as unoccupied time असें **मार्शल हाल** म्हणतो. म्हणजे निव्वळ आळसांत माशा मारीत बसण्या इतकें भयंकर नुकसान दुसरें कोणतेंच नाहीं. त्याचप्रमाणें पारतंत्र्यरूपी महानिद्रेंत घोरत पडलेल्या महाराष्ट्रांत जागृति उत्पन्न करणाऱ्या श्रीसमर्थ रामदासांनींही आपल्या सर्वमान्य **दासबोधांत** असें म्हटलें आहे कीं 'ऐक सदेवपणाचें लक्षण । वायां जाऊं नेदी एक क्षण'! यावरून मनुष्यजन्मास आलेल्या प्रत्येक प्राण्यानें आपल्या आयुष्याच्या प्रत्येक घटकेचा सदुपयोग करणें अवश्य आहे हें उघड आहे.

कोणत्याही दृष्टीनें पाहिली तरी प्रस्तुत आपली स्थिती फारच शोचनीय झालेली दिसते. ती तशी होऊन बसण्यास अनेक कारणें झालीं असतील. पण त्या सर्वांतलें एक प्रमुख कारण म्हटलें तर **वेळेचें महत्व** हें जसें जाणावें तसें फारसें कोणीं जाणलें नाहीं. कांहीं साधुसंतांनीं व पारमार्थिक लोकांनीं या गोष्टीचा विचार केला आहे, नाहीं असा नाहीं. परंतु आपल्या समाजांत अथवा राष्ट्रांत चैतन्य अथवा हालचाल उत्पन्न करविण्याचे **ऐहिक** हेतूनें तो केला असेलच असें म्हणवत नाहीं. प्रस्तुतः जीवर आपण नांदत आहों, जिचें आपण मीठ खात आहों व जी आपली जन्मदात्री आहे ती भूमातासुद्धां 'वेळेचें महत्व' जाणून आपल्या गतींची दिशा बदलते, तर आपणही तिचें अनुकरण करणें नको काय? चंद्र सूर्याचे उदयास्त, समुद्राची भरतीओहटी आणि प्रकाशादिकांच्या गति यांनीं आपलीं कर्तव्यें कधीं—एक दिवस—तरी सोडलीं आहेत काय? आणि तीं त्यांनीं सोडलीं नाहींत म्हणूनच सृष्टीचा व्यापार बिनबोभाट चालला आहे ना?

तेव्हां, मनुष्य जर आपलें कर्तव्य नीट ओळखणार नाहीं आणि तें ओळखून त्याप्रमाणें वागणार नाहीं तर त्याचे घरीं, दारीं, समाजांत

व राष्ट्रांत चोहोंकडे अनर्थ होतील. आणि आपणांला प्राप्त झालेल्या शोचनीय स्थितीचा इतिहास तरी हेंच सांगत आहे. कर्तव्य पराङ्मुखतेचा निबिड अंधार-काळकुट्ट अंधार-ज्या हतभागी राष्ट्रावर पडला आहे त्यावर स्वातंत्र्यभानूचा प्रकाश लौकर पडण्याची आशा नको, म्हणून प्रत्येकानें विशेषतः विद्यार्थीवर्गानें आपलें कर्तव्य करीत असावें व जो तें आमरणान्त करीत राहील त्याचीच जगांत वाहवा होईल आणि प्रकृत निबंध लिहिण्याचा मुख्य हेतु तरी हाच आहे. तो साध्य झाल्यावर स्वोन्नतीचे इतर मार्ग मनुष्याला आपोआप दिसूं लागतात आणि तो त्या मार्गांचें अवलंबनही हळूं हळूं करूं लागतो.

अशा या टुमदार विषयावर एखादा चांगला निबंध मागवावा म्हणून गेल्या वर्षाचे आरंभीं येथील घड्याळांचे सुप्रसिद्ध व्यापारी मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनी यांनीं एक जाहिरात दिली. ती प्रमाणें हा निबंध लिहून त्यांचेकडे गेला. परंतु तो नापसंत ठरून परत आला. पुढें तो येथील दैनिक **इंदुप्रकाशां**तून क्रमशः प्रसिद्ध झाला आणि त्यांत कांहीं सुधारणा होऊन आज तो स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहे. तथापि उपसंहारांत म्हटल्याप्रमाणें जे कांहीं दोष या निबंधांत असतील ते जर कोणी प्रकृत निबंधलेखकास कळविण्याची कृपा करतील तर तो त्यांचा फार आभारी होईल.

त्याचप्रमाणें, हा निबंध छापून प्रसिद्ध करण्याचे कामीं शेट **सूरचंद शिवराम,** मुनीम नाथा रंगजी यांची पेढी मुंबई यांनीं, व रा. रा. **गंगाधर सदाशिव तारे,** पिंपळनेर आऊट एजन्सीचे एजंट-टी. व्ही रेलवे, यांनीं द्रव्यद्वारां जी मदत दिली ती बद्दल प्रकृत निबंधलेखक त्यां[illegible] मनःपूर्वक आभार मानतो. ही मंडळी व्यापारी पेशाची असून त्या[illegible] लक्ष महाराष्ट्रभाषाभिवृद्धीकडे आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

शेवटीं वर सांगितल्याप्रमाणें आपल्या महाराष्ट्रभाषेची थोडी तरी सेवा करण्याचा सुप्रसंग आणून दिल्याबद्दल मेसर्स जी. बी. नाईक आणि मंडळी यांचेही आभार मानणें अवश्य होय.

मुंबई, ग्रेनमर्चण्ट्स असोसिएशन, मशीद बंदर रोड.
ता. १-९-०७.

**एकनाथ गणेश भांडारे.**

# वेळेचें महत्व.

## १ उपक्रम.

सावध सदां असावें संसारीं स्वहितकृत्य साधावें ॥
पुरुषार्थाचें साधन बा! धनसें हें शरीर रक्षावें ॥

—मोरोपंत.

There is a tide in the affairs of men
Which, taken at the flood, leads on to fortune;
Omitted, all the Voyage of their life
Is bound in shallows and in miseries.
On such a full sea are we now afloat;
And we must take the current when it serves,
Or lose our ventures.

--Shakespeare.

### आर्या.

अनुकूल काल असतां, जो करि दुर्लक्ष साधण्या स्वहित
दुर्दैव त्या नराचें! त्याचा तो होय या जगीं अहित! ॥ १ ॥
अनुकूल प्रतिकूल स्थितिचें, फिरतें अहो! सदां चक्र
दक्ष असति बुध म्हणुनी, होऊं देण्या न दैव तें वक्र! ॥ २ ॥

—स्वकृत.

आम्ही हा विषय आपल्यापुढें अशा वेळीं आणीत आहों कीं, जेव्हां हिमालयाचे पायथ्यापासून तों कन्याकुमारीच्या टोंका-पर्यंत आणि आसामच्या पूर्वेपासून तों सिंधूच्या पश्चिमेपर्यंत एक प्रकारची 'स्वदेशी' जागृति उत्पन्न झालेली आहे. ज्याला त्याला असें वाटूं लागलें आहे कीं, देशी भांडवल, देशी धंदे, देशी उद्योग, देशी संस्था आणि देशी भाषा यांची समृद्धि व्हावी व तिला आपण अंशतः कां होईना—पण साह्य करावें. आणि जो वस्तुस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करील व तें निरीक्षण करणारा बुद्धि समतोल ठेवील, तर गेल्या दहा वीस वर्षांत जो हुरुप, जो निश्चय, जी उत्कंठा, जो अभिमान व जो स्वार्थत्याग आमच्या मनोवृत्तींखालीं दडपून राहिला होता तो हुरुप, तो निश्चय, ती उत्कंठा, तो अभिमान व तो स्वार्थत्याग आज बऱ्याच अंशीं सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागला आहे असें त्यास कबूल करावें लागेल. इतकेंच नव्हे, तर आमच्या या 'जागृती'वर व तीमुळें आपोआप घडून येणाऱ्या राष्ट्रीय ऐक्यावर आमच्या बलिष्ठ सरकारचे कांहीं अदूरदर्शी अधिकारी आपल्या अविचारी हुकुमाच्या कुऱ्हाडी घालून आमचेवर एक प्रकारचा उपकार करीत आहेत, याबद्दल त्यांची कींवच करावी असेंही पण प्रत्येकास म्हणावें लागेल ! सारांश सध्यांची

आमची जागृति झोंपेंतून उठून नुसते डोळे चोळीत बसण्यापैकीं नव्हे, तर माझ्या देशाची स्थिति काय आहे? मी कोण? माझें व माझ्या देशासंबंधाचें खरें कर्तव्य काय आहे? याचा विचार, याची चर्चा व तत्संबंधाचा निश्चय बहुतेक सुशिक्षित व अशिक्षित, लहान व थोर, आणि स्त्रीवर्ग व पुरुषवर्ग यांत होऊं लागला आहे; ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. जो तो स्वतःला ओळखूं लागून स्वावलंबनाचा निश्चय एकसमयावच्छेदेंकरून करूं लागला आहे, यापेक्षां दुसरें महोदय पर्व तें कोणतें? आणि दुसरी कपिलाषष्ठी ती कोणती? या महोदयाची ही अपूर्व पर्वणी व कपिला षष्ठीचा हा अपूर्व योग, जर आमच्या देशबांधवांनीं पूर्णपणें साधला आणि त्या साधनानें प्राप्त होणाऱ्या देशोत्कर्षरूपी सायुज्यसदनांत जर ते नांदूं लागले, तर आणखी काय पाहिजे? परंतु मानवी स्वभाव असा आहे कीं, कोणतीही इष्ट गोष्ट—तशांत अप्राप्य गोष्ट—जोंपर्यंत प्राप्त होत नाहीं, तोंपर्यंत तिची आतुरता त्यास विशेष वाटत असते. आणि त्या आतुरतेच्या भरांतच एखादें महत्कृत्य त्याचे हांतून होऊन जातें, किंवा इष्ट तीच गोष्ट त्यास साध्य होऊन जाते. तें महत्कृत्य होऊन गेल्यावर अथवा ती इष्ट गोष्ट घडून आल्यावर त्या महतीची व इष्टतेची आतुरता कमी होऊं लागण्याचा किंबहुना तत्संबंधानें अगदींच बेफिकीर होऊन जाण्याचाही संभव असतो. म्हणूनच धनसंपादन करण्यापेक्षां त्याचा योग्य व्यय करणें जसें कठीण असतें आणि राज्यश्री

संपादन केल्यावर तिला शांततेनें नांदविणें जसें जोखमीचें व शहाणपणाचें असतें, तद्वत् आमच्या चळवळीचें रोज एकेक पाऊल पुढें पाडण्यासाठीं आणि तें कायम ठेवण्यासाठीं देशांतील प्रत्येक व्यक्ति जागृत ठेवणें कठीण असतें. या जागृतीचा अर्थ प्रत्येकानें आपलें व आपल्या देशाचें ज्यांत हित आहे अगर त्याच्या मतें तें ज्यामुळें होण्यासारखें आहे तें शक्य त्या रीतीनें करीत राहणें, असा आहे. आणि हें कर्तव्य बजावीत राहणें म्हणजेच 'वेळेचें महत्व' जाणणें होय.

दुसरी गोष्ट येथें सांगणें अवश्य आहे ती ही कीं, आमच्या देशांत 'वेळेचें महत्व' जाणणारे फारच थोडे आहेत. आणि आज जी आमची सर्व प्रकारें अनुकंपनीय स्थिति चहूं-कडे दृष्टोत्पत्तीस येत आहे, तिच्या अनेक कारणांपैकीं 'वेळेच्या महत्वा' संबंधानें आमच्यांत नांदत असलेलें घोर अज्ञान व औदासीन्य हें एक होय. 'वेळेचें महत्व' जाणून त्याचा पूर्ण सदुपयोग करणारे कै० रा. सा. विश्वनाथ नारायण मण्डलीक हे एकच आमच्या महाराष्ट्रांत होऊन गेले. असे 'मण्डलीक' जर आमच्यांत पुष्कळ असते, तर आमची आजची स्थिति फार निराळी झाली असती. आमच्या वर्त-नांत निराळाच करारीपणा दिसला असता आणि आमचा समाजही अधिक कर्तव्यतत्पर झाला असता. तथापि आम-च्यांत 'जागृति' होत चालली आहे असें जें वर म्हणण्यांत आलें आहे ती 'जागृति' निराळी आणि आजचें 'वेळेचें महत्व' निराळें. या उभय शब्दांचा अन्योन्य संबंध आहे,

नाहीं असें नाहीं. परंतु 'जागृति' जी आहे तींत राष्ट्रीयपणा आहे आणि 'वेळेच्या महत्वां'त व्यक्तिव्यक्तीची सुधारणा आहे; व तिचीच आज आपणांस विशेष आवश्यकता आहे, ही गोष्ट खरी आहे. पण ज्या समाजांत 'वेळेचें महत्व' जाणणाऱ्या व्यक्ती आहेत, त्यांचीच मदत राष्ट्रीय कार्यांत फार मोलाची असते. आणि तें राष्ट्रीय कार्य मोठें पायाशुद्ध असतें. सुदैवानें आपला भाग्यसूर्य लौकरच उदयास येईल अशीं चिन्हें दिसत आहेत. तेव्हां तिच्या मुळाशीं जी 'जागृति' होत आहे व होण्याचा संभव आहे, तिला व्यक्तिव्यक्तींच्या उत्कर्षाची व साह्याची फारच अपेक्षा आहे हें उघड आहे. परंतु विचार करून पाहिल्यास 'वेळेचें महत्व' लक्ष्यांत घेऊन तिचा सदुपयोग करणारे आपल्यांत किती सांपडतील? फारच थोडे! किंबहुना मुळींच नाहींत म्हटलें तरी ती अतिशयोक्ति होणार नाहीं. तेव्हां ठोकळ मानानें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हिरा हा हिरा आहे आणि माणिक हें माणिक आहे असें कळत असूनही आम्हांला त्या हिऱ्यामाणकांची जशी कांहीं पर्वाच राहिली नाहीं! याचें कारण, अझूनही आमचे डोळ्यांवर आळसाची धुंदी चढलेली आहे, हें होय. वस्तुतः अशा हिरेमाणकांच्या खाणी आमच्यापुढें किती तरी पडल्या आहेत! पण जर त्यांचा आम्हीं उपयोगच करीत नाहीं, त्यांच्याकडे ढुंकून सुद्धां पाहत नाहीं, आणि त्या खाणी आमच्या असूनही आमचेपणाची कल्पना आमच्या मनांत येत नाहीं, तर त्या बिचाऱ्या खाणींनीं तरी काय

करावें ? हातांत अमृताचा कलश आहे व तो अमृतानें तुडुंब भरलेला आहे, असें स्पष्ट दिसत असतांही जर आसन्नमरण रोगी तें न पिऊं लागला तर त्या रोग्यास त्याच्या जिव्हाळ्याचीं माणसें जें बोलतील तेंच बोलणें आमच्या आळशी देशबांधवांना लागू पडेल. परंतु अशा बोलण्यांत ममतेचा व हितबोधाचाच भाग विशेष असतो व त्याच्यानें त्यांचा फायदा होण्याचा संभव असतो हें त्यांनीं लक्षांत ठेवावें.

---

## २ परिभाषा.

O gentlemen, the time of life is short:
To spend that shortness basely were too long,
This life did ride upon a dial' s point,
Still ending at the arrival of an hour.

—Shakespear.

### आर्या

आयुष्य फार थोडें, तद्व्यय सत्कारणीं करी सतत
नाहीं तर यम तुजला, उचलुनि टाकील खोल नरकांत ।

—स्वकृत.

मनुष्यप्राणी जन्मास येतो तेव्हां परमेश्वर त्याचेबरोबर एक अजब वस्तु पाठवीत असतो. तिचें अस्तित्व या जगांत नेहमींच आहे. तथापि त्या वस्तूचा जो अंश त्या प्राण्याच्या वाट्याला येतो, तो कोणालाही दिसत नाहीं. पण तो नाहीं असें कोणीही म्हणत नाहीं. तो आहे. त्याची गति नदीच्या वेगापेक्षां अधिक आहे. फार काय ? वाऱ्याचीही

गति एकवेळ कुंठित होईल, पण त्या वस्त्वंशाची गति कधींही कशाही योगानें कुंठित होत नाहीं. तो वस्त्वंश पर्वताखाला भीक घालीत नाहीं, अग्नीनें जळत नाहीं व पावसानें भिजत नाहीं! परंतु अशी ती अजब वस्तु म्हणजे काय? व तिचा अंश आहे कोठें? याची अद्यापीही पुष्कळांस भ्रांति आहे. ती अजब वस्तु म्हणजे कालगति आणि मानवी प्राण्याच्या वाट्याला येणारा तिचा अल्पांश म्हणजे आयुष्य होय. पूर्वजांनीं स्वपराक्रमानें संपादन केलेल्या जहागिरीचा पैसा व्यर्थ खर्च करण्याचें जसें आजकालच्या कांहीं खुशालचंद जहागिरदारांस कांहींच वाटत नाहीं, तद्वत् नरदेहाची किंमत न जाणतां आयुष्याचे दिवस व्यर्थ खर्च करणारे लोक आमच्या देशांत कितीतरी आहेत? पण उपयोग काय?

शत वर्षें वय नेमिलें । त्यांत बालत्व नेणतां गेलें ॥
तारुण्य अवघें वेंचिलें । विषयाकडे ॥
वृद्धपणीं नाना रोग । भोगणें लागे कर्मभोग ॥
आतां भगवंताचा योग ॥ कोणे वेळे ? ॥

—श्रीसमर्थ.

असे उद्गार काढून मोठमोठ्यांनींही हात टेकले, परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. पूर्वीच्या मानानें प्रस्तुतचीं शंभर वर्षांची आयुर्मर्यादा फारच थोडी म्हणावी लागते; कारण एका काळीं ही मर्यादा दहा हजार वर्षें होती; ती पुढें हजारावर आली आणि हजाराची शंभरावर आली आणि आतां बहुतेक ती तर पन्नासावरच येऊन बसल्यासारखी

झाली आहे! म्हणजे मनुष्याचें आयुष्य फारच थोडें आहे. तेव्हां त्याचा व्यय सत्कारणीं करणें अवश्य आहे; नव्हे तसें करणें भागच आहे असें झालें. नाहींतर भडकलेल्या रेल्वे इंजिनापेक्षांही ज्याची गति दुर्धर तें आयुष्य तेव्हांच उडून जाईल! एतावता मनुष्यप्राण्यावरोबर उदयास येऊन त्याचे बरोबरच अस्त पावणारी जी अजब वस्तु तिलाच आपण 'काळ' अथवा 'वेळ' म्हटलें तरी चालेल. हिला मोजण्याचीं जीं साधनें आपणांत रूढ आहेत त्यांला पळें, घटिका, प्रहर, दिवस पक्ष, मास, अयन वगैरे म्हणतात. आणि इंग्रजींत त्यांना सकंद ( Second ), मिनिट ( Minute ), अवर ( hour ) डे ( Day ), वीक ( Week ), मंथ ( Month ), इयर ( year ), वगैरे म्हणतात.

ह्यावरून 'वेळ' म्हणजे घड्याळांतले तास, वालुकायंत्रांतील वाळू अथवा भरत येत असलेल्या घटिकेंतील पाणी नव्हे; तर ते तास, ती वाळू, व तें पाणी आपल्या जीवितरथाचीं चक्रें होत. यांची गति अबाधित असते व त्यांत

१ आकाश म्हणिजे अवकाश । अवकाश बोलिजे विलंबास ॥
त्या विलंबरूप काळास । जाणूनि घ्यावें ॥
सूर्याकरितां विलंब कळे । गणना सकलांची आकळे ॥
पळापासूनि निवळे । युगपर्यंत ॥
पळ, घटिका, प्रहर, दिवस । अहोरात्र, पक्ष, मास ॥
षण्मास, वर्षे, युगास, । ठाव झाला ॥

—श्रीसमर्थ.

बसून जाणारी आपली आयुर्मर्यादाही तितकीच चंचल असते. दिलरुबां नामक कर्णमधुर वाद्याचा आवाज यदृच्छ खुलविण्यास त्याचे आंतील तर्फा जशा कारणीभूत होतात तद्वत् आपल्या आयुर्मर्यादेचा रथ खेंचीत नेणाऱ्या तासांना व घटकांना मिनिटें, सेकंद, पळें, विपळें वगैरे साह्य असतात. म्हणून त्यांचे तडाख्यांत कोणी कसाही आला तरी त्याची वेळेवर इतिश्री व्हावयाचीच ! पण साधु, संत, शहाणे व विचारी या कालचक्रास नेहमीं ओळखून असतात, म्हणूनच ते आपलें कर्तव्य बजावून या जगांत धन्य* होतात, म्हणजे ते काळाच्या तावडींतून सुटतात अथवा त्यांची आयुर्मर्यादा वाढते असें नाहीं, तर ते आपल्या वर्तनानें व कृतीनें जगाच्या अनुभवास असें आणून देतात कीं—

सूरतसे करित बडी, बिनपंख उड ज़ाय ।
सूरत तो जाती रही, कीरत कबहुं न ज़ाय ॥

म्हणजे कीर्तीला परिणत केल्यानें आयुष्याचें सार्थक होतें व—

आला आला प्राणि जन्मास आला, झाला झाला वाढुनी थोर झाला ॥
केला केला व्याप हा फार केला । गेला गेला बापुडा व्यर्थ गेला ॥

अशा रीतीनें ज्यांचा शेवट होतो ते जन्मले काय आणि मेले काय सारखेच; असा त्याचा अर्थ.

---

* The web of our life is of a mingled yarn, good and ill together. Our virtues would be proved, if our faults wipped them not, and our crimes would despair, if they were not cherished by our virtues. —Shakespeare.

तात्पर्य, जन्मल्यापासून मरेपर्यंत व्यक्तिमात्राचे वाट्यास जो काळ येतो त्याला आयुष्य म्हणतात. काळाचा समानार्थी शब्द वेळ होय. तेव्हां वेळ म्हणजे पर्यायानें आयुष्य होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

महत्व—हें भाववाचक नाम आहे. प्रकृत स्थळीं याचा लाक्षणीक अर्थ ‘ योग्यता ’ असा आपण घेऊं. योग्यता म्हणजे श्रेष्ठपणा. योग्यता कळल्याशिवाय कोणालाही श्रेष्ठपणा येत नाहीं आणि कशाचीही काय किंमत कळल्याखेरीज त्याची योग्यता मनांत भरत नाहीं. पैशाला किंमत आहे म्हणून त्याची योग्यता विशेष आहे. परंतु पैशाच्या किमतीपेक्षां मनुष्याची किंमत फार निराळी असते. तेव्हां कोणत्याही मोठेपणाची कल्पना ठाम होण्याकरितां किंमत अथवा योग्यता हा शब्द वापरतात. ‘ वेळेचें महत्व ’ म्हणजे ‘ आयुष्याची योग्यता ’ अथवा त्याचें मोल किती आहे हें मनांत पुरतेपणीं बिंबण्याकरितां ‘ महत्व ’ या शब्दाची योजना करण्यांत आली आहे. कारण खर्च केलेला पैसा पुन्हां आपण मिळवूं शकूं. परंतुः—

‘ गेलेली घटिका पुन्हां परतुनी येणार नाहीं कधीं ’

या श्लोकचरणाप्रमाणें गेलेली वेळा परत येणें अथवा मिळणें अगदींच अशक्य होय. तेव्हां सर्वांना अवश्य व म्हणूनच प्रिय असणाऱ्या पैशापेक्षांही ‘ वेळेचें महत्व ’ अधिक असणें साहजिक आहे.

## ३ आळस.

Why dost thou *careless* lie,
Burried in ease and sloth,
Knowledge that sleeps doth die.
And this *security*,
It is the common moth
That feeds on wits and arts, and so destroys them both.

—Ben Jonson.

### श्लोक.

तूं कां असे दवडिशी दिन आळसांत ?
कां वैर तूं सुमतिशीं करिशी अनुक्त ?
दुर्लक्ष बा ! निजहितीं जरि तूं करीशी-
आत्मोन्नती मग कशी चिर आदरीशी ?

—स्वकृत.

मनुष्याची प्रवृत्ती साहाजिक सुखाकडे फार असते. सहज जें प्राप्त होतें, प्रयत्न केल्याशिवाय जें मिळतें आणि आहार निद्रादि व्यवहाराव्यतिरिक्त कांहींही न करण्यांत जी चैन वाटते, तें सुख सर्वांस हवेसें वाटतें.

परंतु भगवद्गीतेंत श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात:—

यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मन:
निद्रालस्य प्रमादोत्थं तत्तामस मुदाहृतम ॥

"आरंभीं व परिणामीं अंत:करणाला मोह उत्पन्न करणारें;

असें जें निद्रा, आलस्य आणि प्रमाद म्हणजे चुकी यांपासून उत्पन्न झालेलें सुख, तें सुख तामस म्हटलें आहे."

आणि प्रस्तुत आपल्या देशावर याच तामसी सुखाचा पगडा बसला आहे ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. ज्याविषयीं आमचा देश फार प्राचीनकाळापासून अत्यंत प्रसिद्धीस आलेला आहे व ज्याची वाखाणणी निरभिमानतेनें पाश्चात्य राष्ट्रें सुद्धां करतात तीं सात्विक आणि राजस सुखें आमच्यांतून अजिबात लुप्तप्राय झालीं कीं काय असें वाटूं लागतें! मनोमय विमानांत बसून अवघ्या भरतखण्डाचें निरीक्षण जर कोणी अत्युच्च प्रदेशांतून करील तर त्याला काय दिसेल? कोणी निद्रारूपी स्त्रीला गाढालिंगन दिलें आहे; कोणी तिची मार्गप्रतिक्षा करीत आहेत; कोणी चावट पुस्तकें व पत्रें वाचीत आहेत; कोणी पानतंबाखु चघळीत भिंती रंगविण्यांतच करमणूक करून घेत आहेत; कोणी हुक्का तर कोणी विड्या व कोणी गुडगुडी तर कोणी गांजा पीत आहेत; कोणी पत्ते, बिझीक अथवा द्यूत खेळत आहेत; कोणी मादक पदार्थसेवनांत गर्क झाले आहेत; कोणी बाटल्यावर बाटल्या उडवून गटारांत लोळत आहेत; कोणी वेश्यांचे उंबरठे झिजवून घरादारांचा उन्हाळा करीत आहेत; कोणी पापकर्मांचें मंदीर उभारून त्यावर व्यभिचाराच्या अतिरेकाचा कळस चढवीत आहेत; धनाशेनें कोणी खून करीत आहेत; कोणी आपलें घर भरण्यासाठीं दुसऱ्यांस लुबाडीत आहेत; कोणी दुसऱ्याचा गळा कापून आपला खिसा भरीत आहेत;

कोणी स्वतःची चैन अव्याहत चालू ठेवण्याकरितां लोकांचीं घरें उनउन पाण्यानें जाळीत आहेत; कोणी धर्माच्या तर कोणी रूढीच्या आणि कोणी ढोंगाच्या तर कोणी दुसऱ्याच कसल्यातरी आमिषाचें बंड माजवून दुनिया झुकवीत आहेत आणि कोणी तर जुलमाचा अतिरेक करून गरिबांचे निवळ काळ होऊन बसत आहेत! सारांश हे जे प्रकार सांगितले व यांसारखे आणखीही जे सांगण्यासारखे असतील ते केवळ आपल्याच देशांत आहेत असें नाहीं. पृथ्वीवरील सर्व देशांत ज्या ज्या ठिकाणीं आळस म्हणून भरलेला आहे त्या त्या ठिकाणीं त्याचे हे नैसर्गिक परिणाम भिन्न भिन्न परीस्थितींत भिन्न भिन्न रूपानें आढळून येत आहेत. थोड्याशा खटपटीनें पुष्कळ धन व सुख मिळेल व तें कायम टिकेल अशी या आळशांची भ्रामक समजून असते आणि याच भ्रमानें ते दुसऱ्यांबरोबर स्वतःचा नाश करून घेतात! पण जरा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, त्यांच्या पापवृक्षाला या व इतर ज्या आणखी भयंकर शाखा फुटतात त्या सर्वांचा उगम आळसरूपी बियापासून असतो. समर्थ म्हणतातः—

आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे ॥
सुख म्हणोन आवडे । आळशी लोकां ॥
आळस उदास *नागवणा । आळस प्रेत्न बुडवणा ।
आळसें करंटपणाच्या‡ खुणा । प्रकट होती ॥

---

* "In idleness alone is perpetual despair."

‡ "To do nothing but live, when you live for the mere sake of living, and because you cannot help it, is perhaps the dreariest occupation on earth."

*Business*, J. Platt. p. 43.

परंतु जे आळशांतले आळशी आहेत, त्यांच्या हा वेदांत काय उपयोगीं? त्यांच्यामतें त्यांचा देश स्वतंत्रतेच्या सुवर्णानें मंडित झाला काय अथवा त्याचे उरावर परतंत्रतेचे धोंडे पडले काय सारखेच! त्यांचें 'शयनं च मे' व 'घृतं पिब' चाललें म्हणजे झालें! असल्या 'करंट्यां' चें मनाला थर करून सोडणारें समर्थांनींच स्वतः वर्णन केलें आहे:—

करंट्यास आळस आवडे। यत्न कदापि नावडे।
त्याची वासना वावडे। अधर्मी सदां॥
सदा श्रमिष्ट निदसुरा। उगेंचि बोले सैरावैरा।
कोणी एकाच्या अंतरा। मानेचि ना॥
लिहूं नेणें वाचूं नेणें। सवदा सूत घेऊं नेणें।
हिशेब कितेब राखूं नेणें। धारणा नाहीं.॥
हारवी, सांडी, पाडी, फोडी। विसरे, चुके, नाना खोडी॥
भल्याच्या संगतीची गोडी। कदापि नाहीं॥
चाट गडी मेळविले। कुकर्मी मित्र केले।
खटवट एकवटिले। चोरटे पापी.॥
ज्यासी त्यासी कळकटा। स्वयें सदाचा चोरटा।
परघातकी धीट मोठा। वाटा पाडी॥
दीर्घ सूचना सुचेना। न्यायनीति हे रुचेना।
पराभिलाषवासना। निरंतर॥
आळसें शरीर पाळिलें। परंतु पोटावीण गेलें।
सुडकें मिळेनासें झालें। पांघरावयासी॥
आळसें शरीर पिळी। अखंड कुशी कांडोळी।
निद्रेचे पाडी सुकाळीं। आपणांसी॥
जनासी मैत्री करीना। कठिण शब्द बोले नाना
मूर्खपणें आवरेना। कोणी एकासी

कोणी एकासी विश्वास नाहीं । कोणी एकासी सख्य नाहीं
विद्या वैभव कांहींच नाहीं । उगाची ताठा ॥

हर! हर! कोण भयंकर या ‘करंट्यां’ची ही स्थिती? ही स्थिति कीतीही भयंकर असली तरी त्यावरून एक बळकट अनुमान निघतें आणि तें हें कीं, श्रीसमर्थांचे वेळीं किंबहुना त्यांचे पुष्कळ पूर्वींपासून आपल्या देशांत आळसाचें केवळ साम्राज्य होतें. पण तें कां होतें, या प्रश्नाचें उत्तर निरुद्योगीपणानेंच ते वेळीं बहुतेक लोकांना आपलें आयुष्य दगदगीशिवाय खाऊन पिऊन काढतां येत होतें, अथवा येत असावें हें होय. ज्याला उद्योग नाहीं, उद्योग करणें ज्याला आवडत नाहीं अथवा उद्योग असून जो तो करीत नाहीं तो आळशी. हा आळस उपजत नसतो, अनुवंशिक असतो अशी आमची समजूत आहे. मुलाला विशेष ळळा आईबापांचा असतो. त्यामुळें त्यांचें वर्तन जसें असतें तसा त्याचा परिणाम मुलाचे कोंवळ्या मनावर होत असतो. आईबाप आळशी असले तर त्यांचें मूलही बहुधां आळशीच निघतें आणि एकदां त्यांचे अंगीं हा आळस खिळला म्हणजे पुढें तें मूल आळशी निघालेंच म्हणून समजावें.

आळशी आईबाप फार अव्यवस्थित असतात. त्यांच्या आहारविहारांत व वर्तनांत नियमितपणा कधींही सांपडणार नाहीं. ते झटून काम करून सुखी होणार नाहींत आणि कोणी तसें होतील तर त्यांचा ते विनाकारण हेवा केल्याशिवाय राहणार नाहींत. एवंच श्रीसमर्थांनीं केलेलें ‘करंट्या’

चें वर्णन वर जें दिलें आहे तें या आईबापांस पूर्णपणें लागू पडतें आणि त्यांच्या नित्य वर्तनाचें हें प्रतिबिंब त्यांच्या पोराबाळांच्या कोमल मनोरूपीं दर्पणांत पडल्यावर तें तेथें कायम होतें. सुप्रसिद्ध ग्रंथकार स्माईल्स हा आपल्या ' क्यारेक्टर ' नामक एका पुस्तकांत असें लिहितो कीं:—

It is in childhood that the mind is most open to impressions and ready to be kindled by the first spark that falls into it. Ideas are then caught quickly and live lastingly.........The first thing continues for ever with the child. The first joy, the first sorrow, the first success, the first failure, the first achievement, the first misadventure paint foreground of his life."

बालपणीं मुलाचें मन इतकें कोंवळें असतें कीं, कोणत्याही गोष्टीचा पूर्ण ठसा त्यांचे मनावर तत्काल ठसतो. त्या गोष्टीची त्यांना जिज्ञासा होते. आणि ती पूर्ण होतांना त्यांचे मनांत ज्या कल्पना उद्भवतात त्या चिरस्थाई होतात. म्हणूनच मुलांना जी गोष्ट कळते ती तीं कधीं विसरत नाहींत. इतकेंच नव्हे, तर लहानपणाचा आनंद, सुख, दुःख, श्रीमंती, गरिबी, भरभराट अथवा पीछेहट यांपैकीं ज्या गोष्टी त्यांचे वाट्यास येतात त्याच गोष्टींच्या पायावर त्यांच्या भावी आयुष्याची इमारत उभारली जाते.

म्हणून आपलीं मुलें पुढें चांगलीं व कर्तीं निपजावीं अशी ज्या आईबापांची इच्छा असेल त्यांनीं पुढील लेख मनःपूर्वक वाचावा अशी त्यांस नम्र सूचना आहे.

# ४ सत्संग.

श्लोक

सुसंगति सदां घडो, सुजन वाक्य कानीं पडो
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो.

—मोरोपंत.

बाळपणापासूनच मुलाला चांगली संगति असणें फार इष्ट आहे. चांगलीं मुलें, चांगल्या मुली, व चांगले खेळ यांतच तें वाढलें जाणें अवश्य आहे. कारण मानवी आयुष्यांत बाळपण फार महत्वाचें आहे. तें त्याच्या भावी आयुष्यरूपी टोलेजंग इमारतीचा पाया होय आणि हा पाया जितका मजबूद असेल त्या मानानें त्याची पुढील इमारत त्यावर टिकेल. म्हणून मुलांस सत्संगतींत वाढविणें आई-बापांचें कर्तव्य आहे. बालपणीं मुलांची बुद्धि तीव्र असते, ती खेळगड्यांचें व आईबापांच्या नित्यवर्तनक्रमाचें तेव्हांच अनुकरण करविते.* यासाठीं जेवढें चांगलें असून औत्सुक्य-जनक, आनंददायक असून हितावह, व उत्तेजक असून परि-

* Place even a highest-minded philosopher in the midst of the daily discomforts, immorality and vileness and he will insensibly gravitate towards brutality. How much more susceptible is the impressionable and helpless child amidst such surroundings ? It is not possible to rear a kindly nature sensitive to evil, pure in mind and heart amidst coarseness, discomfort and impurity.—Smiles' *Character* Ch, II.

णाम सुखदायी असेल तितक्याच्या बाहेर आपलें मूल सहसा न जाईल अशी खबरदारी घेणें हेंही आईबापांचें—विशेषत: आईचें—कर्तव्य आहे. म्हणून स्वत: आईनें निरलस, उद्योगी, आनंदी, पापभीरु व सदाचरणी असणें फारच अगत्याचें आहे. कारण तिचाच लळा मुलाला विशेष असतो. शंभर शाळा-मास्तर एकीकडे व एक आई एकीकडे असें जॉर्ज हर्बर्ट म्हणतो. आई ही सुशिक्षणाची बोलती चालती प्रतिमा होय. शाळामास्तर हातांत छडी घेऊन मुलांस रागें भरून विद्या शिकवितात. परंतु आईचें शिक्षण तिच्या प्रेमळ वर्तनांत असतें, छडींत नसतें. तथापि तें शिक्षण तिचीं मुलें तेव्हांच ग्रहण करतात. म्हणून परिस्थित्यनुरूप आईवर, बापावर व पालकांवर केवढी जबाबदारी आहे हें वाचकांचे लक्ष्यांत येईलच. सारांश, सत्संगतीचे पायावर मुलाचे आयुष्याची इमारत उभारूं लागली म्हणजे 'शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं' व्हावयाचीं हा सिद्धांत. बाळपण आईबापाच्या सत्संगांत गेलें; व विद्याभ्यास, श्रवण, मनन आणि ब्रह्मचर्य हीं सद्गुरूचे सान्निध्यांत राहिलीं म्हणजे बहुधां तो मुलगा गृहस्थाश्रमांतून मोठ्या दक्षतेनें पार पडण्यासारखा झाला म्हणून समजायाला हरकत नाहीं. तथापि गृहस्थाश्रमांत सुद्धां त्याला सन्मित्रांची मोठीच अपेक्षा असते. असो. तेव्हां प्रस्तुतचें कालमान पाहतां मुलाचे आईबाप सुशिक्षित असणें अवश्य झालें आहे. केवळ बाप सुशिक्षित आहे आणि आईला त्याचा गंधही नाहीं, तर कांहींच अर्थ नाहीं. सुशिक्षणाचा 'लिहितां वाचतां येणें'

येवढाच संकुचेत अर्थ घेऊन उपयोग नाहीं. कारण नुसतें 'लिहितां वाचतां येत' असून जर लेंकुरवाळ्या आईला सांसारिक धोरण नसेल व सत्संग म्हणजे काय याची जर तिला कल्पना नसेल तर तिच्या 'नुसत्या लिहितां वाचतां येण्याची' कांहींच किंमत होणार नाहीं. ज्यापासून उत्तम शिक्षण मिळतें. [1]नरदेहाचें सार्थक कशांत आहे हें ज्या योगानें स्पष्ट कळून येतें आणि 'वेळेचें महत्व' किती आहे याची ज्यामुळें ठाम कल्पना होते तेंच खरें सुशिक्षण होय. अज्ञान म्हणजे अशिक्षित बायकांस हें तत्व कळत नाहीं म्हणून त्यांचीं मुलें बहुतकरून त्यांच्याप्रमाणेंच आळशी, झोंपाळू व करंटीं निघतात. पण सुशिक्षित आयांचीं मुलें तशीं बहुधां निघत नाहींत. सबब 'वेळेच्या महत्वा' ची योग्यता पूर्णपणें अंगीं बाणण्यास सत्संगाचीच आवश्यकता विशेष आहे. सर वॉल्टर स्कॉट हा वाग्देवीचा कंठमणी होण्यास कारण त्याची आई, यवनांच्या जुलमाचा प्रतिकार करून श्रीशिवाजी महाराजांना मराठेशाहीची स्थापना करविण्याची स्फूर्ति उत्पन्न करविण्यास मूळ कारण त्यांची मातोश्री जिजाबाई आणि प्रस्तुतचे बडोदराधिपति श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड महद्योग्यतेस चढण्यास कारण त्यांची राजमाता श्रीमंत जमनाबाई. म्हणून लहानपणीं

---

१ नरदेहाचें सार्थक । कांहीं करावें आत्महित ॥
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥

—श्रीसमर्थ.

मुलांना त्यांच्या मातांची सत्संगति अवश्य *आहे. सत्संग असल्यावर आणि त्यांतच मुलें लहानाचीं थोर झाल्यावर तीं आयुष्याचें म्हणजे 'वेळेचें महत्व' जाणणार नाहींत असें कधींच होणार नाहीं. आतां सर्वच मुलांस सुशिक्षित मातांच्या सत्संगतीचा लाभ घडतो असें नाहीं. वर्डस्वर्थला आई नव्हती पण एक धाकटी बहीण होती. ती त्याचेपेक्षां दोन वर्षांनीं लहान होती. पण तिच्या सत्संगतीचा अत्युत्कृष्ठ संस्कार त्याचे मनावर घडल्यामुळें तो पुढें मोठ्या योग्यतेस चढला. या बहिणीविषयीं तो एके ठिकाणीं असें म्हणतो कीं:-

She gave me eyes, she gave me ears.
And humble cares and delicate fears;

---

* "*We shape the minds of our children in their infancy and boyhood, we can inspire them with a love and legitimate pride in our past history*, and we can create in them a taste for our modern literatures. I believe there are gifted ladies in this advanced Province who have written works which will live in the literature of the land. But all of us, who are without such high gifts—*have the power to train our children in a love of their own history* and literature; *and believe me, the teachings of the nursery have a more lasting and durable influence through life than is generally supposed. The manhood and womanhood of India is our handi-work; let us mothers, train the future manhood and womanhood of India to the service of our country*"—Extract from the Presidentia speech of Her Highness the Maharani of Baroda at Calcutta, Decr. 1906.

या उताऱ्यांतील प्रत्येक शब्द अमोल आहे असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. ३८५०५
१७५

A heart, the fountain of sweet tears,
And love, and thought and joy!

( भावार्थ )

श्लोक.

ती माझी भगिनी; जिनें मज दिली, ही दिव्यदृष्टी बळें ।
यन्मंजुप्रियभाषणीं श्रुतिस ह्या, कर्णत्व तें लाधलें ॥
जेथें प्रेमविवेकहर्षसरिता, वाहे अहोरात्र ते ।
माझ्या पुण्यबळें मिळे हृदय हो ! ह्या एकुल्या मात्र तें ॥

सुप्रसिद्ध साधु ' एकनाथ ' महाराज यांना तर मातृसुख मुळीच नव्हतें. त्यांचा सर्व भार त्यांच्या आजीवर व आजोबांवर होता. ते भगवद्भक्त होते व त्यांच्याच जवळ ते लहानाचे मोठे झालेले होते. यामुळें संस्कार व अंकुर यांची गांठ पडून ते मोठ्याच योग्यतेस चढले. या प्रमाणें लहानपणींच दुर्दैवानें ज्यांच्या माता गत झाल्या पण जीं पुढें महद्योग्यतेस चढलीं अशाही मुलांचीं कांहीं उदाहरणें सांपडतील. पण मुख्य मुद्याची गोष्ट ही आहे कीं, ' देह त्यागितां ' ज्यांची ' कीर्ति मागें उरली आहे ' अशा भाग्यवंतांच्या चरित्राची इमारत विचार करून पाहतां सत्संगतीच्या पायावरच उभारलेली आढळते. म्हणून मुलें सत्संगतींतच लहानाची थोर होण्याची त्यांच्या आईबापांनीं अथवा पालकांनीं खबरदारी घेतली पाहिजे. एकदां त्यांचे मनावर सत्संगतीचा पगडा बसला, तीपासून प्राप्त होणाऱ्या भावी सुखासंबंधानें त्यांची एकदां खात्री झाली आणि सत्संगती हें बावनकसी सोनें आहे असें त्यांना वाटूं लागलें म्हणजे तीं मुलें

पुढें विचारी होतात, आपल्यापेक्षां योग्यतेनें व वर्तनानें थोर असतील त्यांना शरण जाऊन त्यांची संगत धरतात व तदनुरूप वर्तन करून कालांतरानें स्वतःला लोकादरास पात्र करून घेतात. समर्थ श्रीरामदास म्हणतातः—

जयास वाटे देव व्हावा । तेणें सत्संग धरावा ॥
सत्संगेविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥

मोरोपंत म्हणतातः—

**आर्या.**

सत्संगमींच नानादुःखार्थ तथापि चित्त रंगतसे ।
जलनिधितरंग वातें, सत्संगें उठति चित्तरंग तसे ॥
सत्संग असें म्हणतो, कीं 'जें बालक करील आ म्यां तें ।
द्यावें अमृत प्राशुनि, जें न पुन्हां आदरील आम्यातें' ॥

तुकाराम म्हणतातः—

**अभंग.**

संताचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःख लेश ॥
तेथें मी राहीन होऊनि याचक । घालतिल भीक तेचि मज ॥
संताचिये गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धनवित्त ॥
संताचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्व काळ ॥
संताचा उदीम उपदेशाची पेठ । प्रेमसुखासाठीं देती घेती ॥
तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी । म्हणोनि भिकारी झालों त्याचा ॥

अमृतराय म्हणतातः—

**पद**

संतपदाची जोड । दे रे हरी ॥ ध्रु० ॥
संतसमागमें आत्मत्वाचा । सुंदर उगवे मोड ॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरवि जीविचें कोड ॥ २ ॥
अमृत म्हणे रे हरिभक्तांचा । शेवट करिसी गोड ॥ ३ ॥

सारांश, संतसज्जन हे परीस होत. ते वाटेल त्या लोखंडाचें सोनें करूं शकतील. मात्र हे परीस कोठें आहेत व कसे आहेत त्याचा शोध करणारांनीं मनाचा निश्चय करून मग त्यांच्या संगतीचा लाभ घेतला पाहिजे. कारण आरंभीं आरंभीं ही संगत किंवा हा सत्समागम सुखावह वाटत नाहीं. बहुतेक प्रसंगीं तो कष्टमय असतो आणि कधीं कधीं तर तो पूर्ण कसोटीच घेतो. पण त्यांतूनही जे पार पडतात ते पुढें सत्समागमापासून होणाऱ्या खऱ्या सुखानंदास पात्र होतात. म्हणून सत्संगतीचें बाळकडूं लहानपणीं आईबापांनीं, विद्यार्थीदशेंत गुरूंनीं आणि तारुण्यदशेंत सन्मित्रांनीं पाजण्याचा क्रम ठेविला म्हणजे 'वेळेचें महत्व' काय असतें व तिचा आपण उपयोग कसा करावा याचें कोडें त्यांस मुळींच पडत नाहीं.

---

## ९ उद्योग.

करावे सायास आपुल्या हिताचे । तेथें आलियाचें मनुष्यपण ॥

—तुकाराम.

'स्वामी! वैरी कोण?' 'छात्रा! तो शत्रु जो अनुद्योग ।
ज्या उद्योगाभावें पावति विलयासि सर्व सुखभोग' ॥

—प्रश्नोत्तरमाला; मोरोपंत.

आम्ही आज जे इतक्या हीनावस्थेप्रत पोंचलों आहोंत, याचें कारण आमचा आळस व आमची कर्तव्यपराङ्मुखता होय. या उभयतांस आम्ही आपल्या देहरूपी गृहांतून हांकलून लाविलें असतें तर, त्यांची कन्या 'हीनावस्था' हिच्या तावडींत आम्ही कधींच सांपडलों नसतों.

पण सांपडलों आहोंत, त्या अर्थी तिचा प्रतिकार करणें आमचें कर्तव्य आहे, आणि तें करूं लागणें म्हणजेच 'वेळेचें महत्व' जाणणें होय. पण या दोन शब्दांत असें काय विलक्षण आहे कीं ते उच्चारतांच मनाची–विचारी मनाची–मोठी चमत्कारिक स्थिति व्हावी? तीं इतकी कीं, तिचें वर्णन करणें सुद्धां कठीण! कारण कर्तव्य म्हणून ज्यानें जें करावयाचें, तें त्यानें केलें असल्यास अथवा तें करणें त्यांचे अंगवळणीं पडलें असल्यास त्याला हे दोन शब्द उच्चारल्यानें झाल्यास एक प्रकारचें समाधानच होतें. नव्हे सुखही होतें. परंतु कर्तव्यपराङ्मुख मनुष्याच्या मनावर याच दोन शब्दांचा मोठा उद्वेगजनक परिणाम होत असला पाहिजे, अशी आमची समजूत आहे. कारण उघडच आहे कीं —

> कीर्ति करून नाहीं मेले । ते उगेच आले आणि गेले ॥
> शाहणे होऊनी भ्रमले । काय सांगावें ? ॥
>
> —श्री समर्थ.

तात्पर्य, कर्तव्य केल्याशिवाय गति नाहीं. आणि ज्या अर्थी पृथ्वीवरील अवघ्या सृष्टींत अचल असें कांहीं नाहीं, सर्वत्र चल म्हणजे हालचाल आहे, त्या अर्थी मनुष्यानेंही हालचाल करणें नैसर्गिक आहे. स्वस्थ जो पडून राहील, त्यांत आणि दगडांत फरक तो काय? दगडाचा कांहीं उपयोग तरी करून घेतां येतो, परंतु आळशाचा तोही नाहीं. आळशी स्वतः कांहींही करीत नाहींत,

निदान स्वावलंबनाच्या दिशेकडे तोंड सुद्धां करीत नाहींत, म्हणून त्यांची उन्नति कधींच होत नाहीं. आणि उद्योगी लोक ज्या मानानें स्वोन्नतीसाठीं झटतात त्या मानानें त्यांचें पाऊलही पुढें पडतें. परंतु अशांची उन्नति अथवा वैभव पाहून आळशांचें विनाकारण पोट दुखतें. तें इतकें कीं, त्या आमिषानें ते कधीं कधीं परघ्नतेचें जालीम विष आणून पापभीरु बिचाऱ्या उद्योगशील लोकांवर त्याचा अकारण प्रयोग करतात; म्हणून 'येतुघ्नंति निरर्थक परहितं ते केऽन जानीमहे' अशा कोटींतल्या या भारभूतांस श्रीसमर्थ मोठ्या कळकळीनें सांगतात कीं:—

लहान थोर काम कांहीं । केल्या वेगळें होत नाहीं ॥
करंट्या सावध पाही । सदैव होसी ॥
अंतरीं नाहीं सावधानता । यत्न ठाकेना पुरता ॥
सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैची ॥
म्हणोनि आळस सोडावा । यत्न साक्षेप जोडावा ॥
दुश्चित्तपणाचा मोडावा । थारा बळें ॥

किती बहुमोल उद्गार आहेत हे? पण जन्मांधांस हा आरसा काय कामाचा? अथवा जन्मबधिरांस हें गान काय उपयोगी? जन्मांध असो वा जन्मबधिर असो, अथवा आळशी असो वा कोणी असो; त्या सर्वांचा जन्म 'चल' सृष्टींत आहे. म्हणून—

नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्य कर्मकृत्॥
कार्यते ह्यवश: कर्म सर्व: प्रकृतिजैर्गुणैः ॥

"कांहीं ना कांहीं केल्यावांचून क्षणभरही कोणी राहू शकत नाहीं. प्रकृतीचे गुण प्रत्येकाकडून बळेंच कर्म करवितात." असें श्रीकृष्णांनींच स्वत: अर्जुनास सांगितलें आहे.

यावरून मनुष्यास उद्योग करणें भाग आहे अथवा त्यानें उद्योगी असावें असा ईश्वरी हेतूच आहे. मग त्या हेतूविरुद्ध जाऊन जे कोणी आपल्या आयुष्याचा भलतीचकडे उपयोग करतात त्यांना 'करंट्या' शिवाय दुसरें कोणतें नांव द्यावें? वस्तुत: उद्योगासारखा दुसरा शिक्षक नाहीं. उद्योगानें मनुष्य शांत, आत्मसंयमी, सावध, एकाग्र आणि धैर्यवान् होतो. त्याची आपल्या धंद्यांत गति चांगली होते. त्याला वळण चांगलें लागतें आणि संसाराचा गाडा तो सुयंत्रित हांकतो. ज्या रस्त्यानें हा गाडा चालावयाचा असतो, त्यांत खाचखळगे, नदीनाले, डोंगरकडे वगैरे बरेच असून त्या सर्वांस कधीं वळसा घालून अगर कधीं ओलांडून जावें लागतें. आणि अशा रस्त्यानें जाणारा, संसाराचा गाडा हांकण्यांत मोठा दक्ष व हुषार असावा लागतो. ही दक्षता आणि हुषारी उद्योगानें प्राप्त होते, म्हणून सुखाच्या सायुज्यसदनास जातांना देहास मोठेच कष्ट पडतात. तथापि, हे कष्ट पडल्यानंतर त्या सायुज्यसदनास पोंचल्यावर जो आनंद होतो व जें समाधान वाटतें तें अजब असतें. त्यास उपमा नाहीं म्हटली तरी चालेल. आज रेल्वे, तारायंत्र, आगबोट, टपाल व मोठमोठे यांत्रिक कारखाने, यांपासून एकंदर मनुष्यजातीला जें सुख होत आहे तें चुटकीसरसें मिळूं लागलें काय? किंवा 'आरबी भाषेंतील सुरस गोष्टी' तील कंदीलावरून हात फिरवितांच या गोष्टी आपल्या देशांत आल्या काय? नाहीं. त्या प्रस्तुत योग्यतेस आणण्यासाठीं

उद्योगी माणसांनीं भगीरथ प्रयत्न करीत आयुष्यें घालविलीं; अगणित द्रव्य खर्च केलें; लक्षावधी माणसें कित्येक वर्षें त्या कामांत राबविलीं; मोठमोठे डोंगर फोडले; गंगायमुनेसारख्या नद्या व वसईसारख्या जंगी खाड्या, यांवर लोखंडी पूल बांधले; लोखंडाचा रस करून त्याचीं अनेक यंत्रें बनविलीं आणि नंतर त्यांच्या श्रमरूपी वृक्षराजीस आजच्या सारखीं राष्ट्रीयसुखाचीं सुंदर फळें आलीं! ज्या उद्योगाच्या दिशेचें पर्यवसान राष्ट्रीय कल्याणांत होतें तो उद्योग आरंभीं जरी कष्टप्रद वाटला, त्यांत लवकर यश नाहीं आलें आणि एखादे वेळीं कांहीं अपरिहार्य कारणामुळें तो अंगावर आला, तरी त्याची चिकाटी सोडतां कामा नये. राष्ट्रीयसुखाचे जबर उद्योग ह्या मानिनी देवताच होत. त्या एकदम कधींही कोणाला प्रसन्न होत नाहींत. परंतु त्यांची सेवा अर्चा करण्यांत तपेंचीं तपें गेलीं म्हणजे त्या प्रसन्न होतात आणि तुमचें जें मनो-वांछित असतें तें त्या सढळ हातानें पूर्ण करून सोडतात. म्हणून उद्योगाची दिशा नेहमीं राष्ट्रीयकल्याणाची असावी. कारण राष्ट्राचें कल्याण झालें अथवा तें उत्कर्षावस्थेस पोंचलें म्हणजे त्यांतील उद्योगी व्यक्तीही त्या मानानें उत्कर्ष पावल्या म्हटल्यास हरकत नाहीं. मात्र व्यक्तिविषयक स्वार्थैकदृष्ट उद्योगाचा राष्ट्रास कांहीं उपयोग नसतो; परंतु राष्ट्राच्या उत्कर्षानें त्यांतील व्यक्तींचा मात्र उत्कर्ष होणें साहजिक असतें. म्हणून उद्योगास सर्वांनीं कल्पतरु समजून त्याची जोपासना करणें योग्य. पण तो तात्कालसुखदायी नाहीं

म्हणून तो न करणें अथवा टाळणें यासारखा वेडेपणा दुसरा नाहीं.

भगवद्गीतेंतही म्हटलें आहे कीं :—

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धि प्रसादजम् ॥

म्हणजे आरंभीं विषासारखें कडूं, परंतु परिणामीं अमृतासारखें गोड आणि जें आत्म्याच्या विचारामध्यें निमग्न आणि सुप्रसन्न अशा बुद्धीपासून उत्पन्न होतें, तें सुख सात्विक म्हटलें आहे.

एतावता मनुष्याचें पाऊल उद्योगाशिवाय पुढें पडत नाहीं. जीवनार्थ कलह सर्वांच्याच मागें लागलेला आहे. कांहींना मजुरासारखें खपावें लागतें व कांहींना अर्धपोटीं राहावें लागतें; पण त्या सर्वांस कांहीं तरी उद्योग करावा लागतो हें खास. तसा उद्योग जर कोणी न केला तर त्याला रोजची एकादशी पडेल! पण तितकें पुण्यवान् त्यांनीं होऊं नये अशी ईश्वरी इच्छा दिसते! कित्येकांच्या मतें मजुरी करणें अगर मजुरासारखें खपणें यांत हीनपणा आहे; पण आम्ही म्हणतों तेच मजूर सोन्याचे कडीतोडे व रत्नाचे अलंकार घातलेल्या आळशी व निरुद्योगी राजपुत्रापेक्षांही योग्यतेनें थोर आहेत.*

---

* एकानें म्हटलें आहे कीं,:—

With labour, hunger, peace of mind.
In coarsest food you'll true health find.

उद्योगें लागते भूक । चित्तीं उल्हास वाटतो ॥
कदान्न खाउनी शाक । आरोग्यें देह थाटतो ॥

—सत्कृत.

कारण, अवश्य अशा उद्योगांत मग्न असणें हें मनुष्यास भूषणावह आहे. मनुष्य मोठा होतो तो उद्योगान आणि जगाची सुधारणा होते ती उद्योगानेंच.

कोणालाही काय, त्याच्या परिस्थित्यनुरूप उद्योग करणें भाग आहे. राजा झाला तरी त्याच्यापुढें प्रजेच्या कल्याणार्थ त्याला कराव्या लागणाऱ्या अनेक महत्वाच्या गोष्टी असतात आणि एखादा शेतकरी झाला तरी त्याला पोटासाठीं नांगर हाकावा लागतोच. आतां राजा आपला उद्योग दरबारांत, मंदिरांत किंवा महालांत बसून करील व शेतकऱ्यास उन्हांत राबावें लागेल; परंतु दोघांनाही उद्योग करणें भाग आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. राजा आपलें कर्तव्य करणार नाहीं तर त्याच्या वैभवाचा त्याला लवकरच कंटाळा येईल, अलंकार भूषणांचें त्याला ओझें वाटेल, पंचपक्वान्नांचा त्याला वीट येईल आणि कदाचित् त्याची पट्टराणीही त्याला नकोशी होईल! उघडच आहे, ज्यांचे पैशावर त्याची येवढी मिजास चालते, त्या प्रजाजनांचा दुवा—त्यांचा धन्यवाद संपादन करणें—अर्थात् त्यांच्या कल्याणाच्या अनेक गोष्टी करणें हें त्याचें मुख्य कर्तव्य आहे. तें जर तो करणार नाहीं—म्हणजे त्याच्या परिस्थित्यनुरूप त्यास अवश्य होऊन बसलेला जो उद्योग, तो जर तो करणार नाहीं तर, त्याच्या मनाला समाधान वाटावें कसें ? तीच गोष्ट शेतकऱ्याची. तो वेळेवर आपलें शेत नांगरणार नाहीं, त्याची नीट मशागत करणार नाहीं, पीक आल्यावर धान्याची मळणी करणार नाहीं, तर परिणाम काय होईल ?

श्री ज्ञानेश्वर म्हणतातः—

‘ जयाचें ऐहिक धड नाहीं । तयाचें परत्र पुससी काइ ? ’ ॥

असो.

उद्योग करणें व त्यापासून जी ओलीकोरडी भाकरी मिळेल, तीवर संतुष्ट असणें यासारखें जगांत सुख नाहीं. फ्रँकलीन म्हणतोः—उद्योगरूपी भांडवल जीवनरूपी व्यवसायांत घातलें तर, आपण ज्या मानानें कष्ट करूं त्या मानानें आपल्यास त्याचें आमरण व्याज मिळेल. ग्यारिबाल्डी ह्मणतोः— मनुष्यास ‘ उद्योगी ’ ही पदवी मोठ्या सन्मानाची आहे. कारण स्वातंत्र्याचा खरा जिवंत झरा तींत आहे. आणि प्ल्याट म्हणतो कीं, इंग्रजांची आधिदेवता उद्योग आहे. आपल्या सततोद्योगानें त्यांनीं आपली जन्मभूमी ( इंग्लंड ) पृथ्वीच्या पाठीवर अत्यंत सन्मानास्पद करून सोडली आहे. उद्योगानें इंग्रज पुढें सरसावले आणि उद्योगानेंच ते आजचें सुख, स्वातंत्र्य, वैभव व सत्ता भोगीत आहेत !

उद्योग ही ईश्वरीदेणगी आहे. म्हणून बुद्धि आणि शरीर यांची गति जेथपर्यंत जाऊं शकेल तेथपर्यंत उद्योगाची मजल पोंचविण्याचा प्रत्येकानें निश्चय केला पाहिजे. ‘उद्यां!’ अथवा ‘आगखी घटकेनें!’ म्हणून कोणत्याही कामाची हेळसांड करून उपयोगीं नाहीं. जे वेळीं जें काम करणें योग्य, तेच वेळीं तें काम झालेलें चांगलें. ज्याला स्वतंत्रतेनें वागण्याची अत्यंत हौस आहे त्यानें तर ‘आधीं काम आणि मग आराम’ हें तत्व नेहमीं डोळ्यांपुढें

ठेविलें पाहिजे. प्रत्येकानें आपल्या मनाशीं असा विचार केला पाहिजे कीं, मला या जन्मांत अमूक एक कर्तव्य करणें आहे व तें केलें तरच जन्मास आल्याचें सार्थक आहे. परंतु हें तत्त्व लहानपणींच जर मनावर बिंबविलें जाईल, तर वाढत्या वयांत तें उराशीं धरण्यास अथवा प्राणापेक्षांही प्रिय मानण्यास कोणी मागें घेईल, असें वाटत नाहीं. द्रव्यसंचयासाठीं उद्योग करणें सध्यां आपणांस भाग आहे खरा, पण तें मिळाल्यावर आपलें कर्तव्य संपलें अशी कल्पना करणें मात्र गैर आहे. ईश्वरकृपेनें तुम्ही श्रीमंत झालां; तर तुम्हांला उद्योगांची वाण पडेल असें मात्र समजूं नका. 'परोपकाराय सतां विभूतयः' इकडे लक्ष असूंद्या आणि 'वसुधैव कुटुम्बकम्' या तत्वास अनुसरून तुम्ही आपल्या आयुष्याचा, आरोग्याचा, विद्वतेचा, औदार्याचा आणि दूरदृष्टीचा परोपकारांत व्यय केल्यास देवपणा आपण होऊन तुमच्या ठिकाणीं वास करूं लागेल.* या जगांत दुःखी फार व सुखी थोडे आहेत; म्हणून दुःखानें आर्त झालेल्यांस सुखी करणें तुमचें कर्तव्य आहे. लेखन, वाचन, कला, कौशल्य, शास्त्र, विचार आणि शोध यांचा अनुभव तुम्ही आपल्या देशबांधवांस द्याल तितका थोडा. कारण ज्यांच्या मनोभूमींत या झाडांचें एकदां बीजारोपण

---

* That light we see burning in my hall,
How far that little candle throws his beams!
So shines a good deed in a naughty world.

—*Shakespeare.*

होऊन त्यांची पुन्हां झाडें होऊन तीं फलभारानें विनम्र होण्याचे बेतांत आलीं आहेत, अशा विभूति फारच थोड्या असतात. तेव्हां अशा थोड्यांनींच हा महत्कार्यभार शिरीं घेऊन राष्ट्राचा उद्धार करणें योग्य. सारांश, आयुष्याचा व्यय कोणता तरी थोर, उदात्त व राष्ट्रीय हेतु मनांत धरून त्यांत करणें हेंच जन्मास आल्याचें सार्थक होय.

प्रत्येकाचे डोक्यावर काळजीचें मोठें ओझें बहुतकरून असतें. त्यांत अडचणीच्या काठ्या पुष्कळ असतात. त्या सगळ्या एकदम मोडून टाकणें मनुष्याच्या शक्तीबाहेर आहे. पण मनुष्य विचारी व युक्तिवान् आहे. तो अडचणीची एक एक काठी घेऊन कधीं युक्तीनें तर कधीं शक्तीनें ती मोडून टाकील. आणि अशा रीतीनें एकंदर सर्व काळजींतून मुक्त होईल. परंतु तें ओझें पाहातांच ज्याची कंबर मोडेल, त्याच्या हांतून काय व्हावयाचें आहे? काल्पनिक संकटांचा बाऊ करून नाउमेद होऊन बसण्यासारख्या वेडेपणाला तर उपमाच नाहीं. हीं संकटें रिकामटेकड्याला दिसतात. त्याचें मन रिकामें असतें. त्यामुळें तेथें कुविचाररूपी 'सैतानाचा मेळा थयथयाट' करितो! उद्योगी मनुष्याचें मन रिकामें नसतें, तेव्हां त्याचे मनांत काल्पनिक संकटांचा व दुःखांचा रिघावच होत नाहीं. त्याला नेहमीं उद्योगमग्न असण्याची सवय. तींत तो आनंदानें असतो. तींत श्रमाच्या मानानें द्रव्याची बहुधां भर पडते. आणि द्रव्यसंचयानें उद्योगी मनुष्याला म्हातारपण मोठें सुखाचें जातें. जगांतलीं सर्व मनुष्यें

सारखीं श्रीमंत होणें अशक्य आहे हें जरी प्रत्येकाला ठाऊक असतें तरी उद्योगानें श्रीमंत होण्याचा अधिक संभव असतो आणि म्हणूनच सर्वांनीं उद्योगी असणें चांगलें.

मृत्यु कधीं कोणावर घाला घालील याचा नियम नाहीं. परंतु नियमितपणानें वागून नियमित वेळीं नियमित काम करण्याचा प्रघात ठेविला तर, मृत्युशींही टक्कर मारणें शक्य आहे. संवयीनें अगर अभ्यासानें म्हातारपणांत सुद्धां उद्योग करितांना तारुण्यांतली तरतरी दिसते! आहारविहार आणि कामकाज यांत जो नेमस्त व चोख राहतो तो कधींही लौकर थकत नाहीं, मग तो प्रत्यक्ष राज्यव्यवहारदक्ष असो अथवा मडकीं घडणारा कुंभार असो. हल्लीं आपली आयुर्मर्यादाच थोडी आहे आणि मरण कोणालाही सुटलेलें नाहीं हें खरें, परंतु जोंपर्यंत आपल्या देहांत जीव आहे, तोंपर्यंत आपलें कर्तव्य आपण करावें आणि तें चांगलें असावें हें निर्विवाद आहे.

उद्योगाबरोबर आज्ञाधारकता अंगीं असणें चांगलें, किंबहुना अवश्य होय आणि हिचा अंकूर मुलांच्या मनांत कोमलावस्थेमध्यें उद्भवलेला चांगला. माझ्यानें अभ्यास होत नाहीं. मला त्रास फार पडतो आणि असा त्रास सोसून जर मी घोकंपट्टी करीत राहिलों तर, त्यांत माझेंच नुकसान आहे. कारण पंतोजीचा कटाक्ष मजवर फार आहे! यापेक्षां एकादी नोकरी अगर उद्योगधंदा पाहणें बरें. अशा प्रकारची मुलाची तक्रार ऐकून जे आईबाप त्याची कींव करून त्याला

नोकरीसाठीं अगर उद्योगधंद्यासाठीं अनुमोदन देतात, ते त्याचे शत्रु होत. शिक्षकांकडून विद्यार्थ्याला त्रास होत असेल, नाहीं असें नाहीं. पण तो कां होत आहे? याचा खुलासा काढणें आईबापांचें काम आहे. शिक्षकाची आज्ञा पाळणें, वडिलांशीं नम्रपणें वागणें व ते म्हणतील तसें बिनतक्रार विद्यार्थीच राहणें, हें तुमच्याच फायद्याचें आहे, असें त्यांनीं आपल्या मुलांच्या मनांत ठसविणें योग्य आहे. विद्यार्थीदशेंत आज्ञाधारकता जर अंगीं बाणली गेली—आणि बाणली जाणें अवश्य आहे—तर त्यांचें पुढील आयुष्य बरेंच सुखांत जाईल. शिक्षक, वडील, थोर आणि आईबाप यांच्या आज्ञेंत वागणें हा ईश्वरी नियम आहे. हें तत्व लहानपणीं मुलांच्या हृत्पटलावर जितकें खोल कोरून ठेविलें जाईल, तितका त्यांचाच पुढें फायदा होईल.

जीवनरूपी नदीचा ओघ कधींही सरळ नसतो. मात्र तो तसा करणें—आपल्यास ज्या रीतीचा पाहिजे आहे तसा करून घेणें—हें ज्याच्या त्याच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. आणि कर्तृत्व हें कर्तव्यावर अवलंबून आहे. कर्तव्य हें उद्योग, गांभीर्य, सुस्वभाव व सद्वर्तनावर अवलंबून आहे. सभोंवतालची परिस्थिति पहावी, आपली स्वतःची सुधारणा कोण कशी करून घेत आहे हें लक्ष्यांत आणावें आणि 'वेळेच्या महत्वा'चा कोण कसा उपयोग करून घेत आहे, हें पाहून तदनुरूप आपलें वर्तन ठेवावें. अंधारांत जसा दिव्याचा उजेड पडतो, तद्वत् कर्तव्यशून्य व आळशी

मनुष्यावर उद्योगी मनुष्याचा अंशतः तरी परिणाम घडतो. इतकेंच नव्हे तर या जगांत जो उद्योग करील त्याचाच निभाव लागेल, हेंही तत्व त्यास कोणीही न सांगतां आपो-आप कळतें.

ईश्वरानें आपल्याला जो मनुष्यजन्म दिला आहे तो कशाकरितां? आळशी होऊन निजण्याकरितां कीं उद्योगी होऊन जन्माचें सार्थक करण्याकरितां? काम करणें बरें कीं न करणें बरें? काम केल्यानें मनाला आल्हाद वाटतो. तुमचा अनुभव कसा आहे म्हणून विचारिलें असतां उद्योगी मनुष्य म्हणेल, मला काम करण्यांतच मौज वाटते आणि आळशी व निरुद्योगी म्हणेल मला मौज अशी मुळींच कशांत वाटत नाहीं! सुदैवानें येवढें बरें आहे कीं, जगाची प्रगति उद्योगानें होत आहे व उद्योगानेंच रंकाचा राव होण्याचा संभव असतो–निदान तो ईश्वरास आवडत असतो–हें तत्व सर्वसंमत आहे आणि अनुभवही तसाच आहे. नाहीं तर या आधींच कष्टमय व दुःखमय जगांत अनेक रूढ दुर्गुणांचें जाळें सर्वांवरच पडलें गेलें असतें! पण याही म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं. कारण ज्याला स्वतःच्या सुखदुःखाची सुद्धां पर्वा नाहीं, तो आळशी दुसऱ्याकडे थोडाच पाहणार आहे! आळस म्हणजे दुःख, शोक व नाउमेद यांचा मूर्तिमंत ठसा! म्हणून नेहमीं उद्योगमग्न असणें चांगलें. उद्योगाला कित्येक वैद्य म्हणतात. कारण तो दुःख, निराशा, हलगर्जीपणा वगैरे अनेक व्याधींना शरीराच्या बाहेर घाल-

वितो. त्यामुळें रोग्याला सुख, समाधान व गाढ निद्रा यांचा लाभ होतो.

उद्योगाची महति वर्णावी तितकी थोडी आहे. त्याच्या महतीनें व उदाहरणानें सर्व जग भरलें आहे. केवळ उद्यो-गाच्या बळावर श्रेष्ठ पदवीस चढलेले महात्मे कोणाच्या नजरेस आले नसतील, असें नाहीं. श्रेष्ठतेचा पाया स्वाव-लंबन होय. आणि अधोगतीचें मूळ परावलंबन होय. यासाठीं जीवनसंग्रामांत विजय संपादण्याचें खरें शस्त्र उद्योग होय. 'अमुक काम माझ्या आटोक्यांत आहे म्हणून तें वाटेल तेव्हां मला करतां येण्यासारखें आहे अथवा ही वेळच अशी आहे कीं तें काम माझे हातून आपोआप झालेंच पाहिजे' अशी फुशारकी मारणें व्यर्थ होय. कारण जो अशी फुशारकी मारून स्वस्थ बसतो, तोच शेवटीं तोंडघशी पडतो! त्याच-प्रमाणें सुखाच्या गोड कल्पना मनांत येतांच त्या मोठ्या सुंदर वाटतील, परंतु त्या अनायासें हस्तगत होतील असें मात्र समजूं नये. त्यांस दृश्यरूप आणून त्यांचेपासून इष्ट तो कार्यभाग साधण्यास दृढनिश्चयानें उद्योग केला पाहिजे. उद्योगाशिवाय सर्व व्यर्थ.

उद्योगानें शरीर आणि मन एकाग्र होतें. उद्योगानें वेळेचा म्हणजे आयुष्याचा सद्व्यय होतो आणि उद्योगानेंच दुसऱ्याच्या उपयोगीं पडतां येतें. फार काय? ज्यांकडे पाहून जग आश्चर्यानें तोंडांत बोट घालतें, अशीं मोठमोठीं कामें-जगांतलीं आश्चर्यें-उद्योगानेंच होतात. ऋषींचे प्राचीन

ग्रंथ पहा, वेरूळ वगैरे ठिकाणचीं लेणीं पहा, ईजिप्तमधील मनोरे पहा, चीनमधील राक्षसी भिंत पहा, अटलाँटिक महासागरांतून नेलेलें तारायंत्र पहा, सुवेझचा कालवा पहा आणि निरनिराळ्या शतकांत झालेलीं निरनिराळीं अद्भुत अशीं मानवीं कृत्यें पहा. त्यांसाठीं केवढे भगीरथ प्रयत्न झाले असतील आणि कितीकांनीं आपली बुद्धिमत्ता त्यांत प्रदर्शित केली असेल? या महदुद्योगांनीं अनेक राष्ट्रांचा व्यापार व दळणवळण हीं वाढलीं आणि त्यांपासून जो तो आपला जरी फायदा करून घेत आहे तरी, राष्ट्राराष्ट्राच्या स्नेहसंबंधांत अधिकाधिक भर पडत जात आहे, हें काय थोडें आहे? क्लॅरेंडन म्हणतो:—अशी कला कोणती आहे व असें शास्त्र कोणतें आहे कीं, ज्यांचे प्रांत अथवा खुद्द अंतःपुर उद्योगाला साध्य होत नाहीं? एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राची किंमत उद्योगावरून करितें. तात्विकदृष्ट्या उद्योग हा परिस आहे. याला वाटेल ती धातु लावा व वाटेल तो दगड लावा, त्याचें सोनें झालेंच पाहिजे. असो.

सध्यां आपल्यास या परिसाची फार अवश्यकता आहे. त्यावांचून आपलें अडलें आहे. त्याशिवाय, आपलें पाऊल पुढें पडत नाहीं. व त्याशिवाय, आपल्याला 'वेळेचें' खरें 'महत्व' कळणार नाहीं.

जे उद्योगी लोक निश्चय, शिस्त व करारीपणा कायम ठेवून आपलें पाऊल पुढें टाकतात, ते कोणत्याही स्थितींत असले तरी लौकर उदयास येतात. केवळ उद्योगाचे बळावर

स्वतःचें नशीब काढलेले लोक आमच्या देशांत बरेच सांपडतील. परंतु त्यांपेक्षां ते यूरोप, अमेरिकेंत जास्त सांपडतील. कारण आमच्यांत दम कमी. त्यांच्यांत अधिक. एखाद्या कारखान्यांत आज भांडवल घातलें तर, त्यावर झालेला नफा दुसरे दिवशीं पदरांत पडलाच पाहिजे, इतका आमचा उतावळेपणा. त्यांच्यांत भांडवलावर झालेला नफा भांडवलांत घालून ज्या कारखान्यांत तें घातलें असेल तो कारखाना चांगला नांवारूपास आल्याखेरीज ते नफ्याची हांव–विलक्षण हांव–कधींही धरीत नाहींत, इतका त्यांचा धिमेपणा! आमच्यांत परस्परांवर असलेला अविश्वास विलक्षण दिसतो, त्यांच्यांत तितका दिसून येत नाहीं. व आमचा कारखाना डबघाईस आला तर आम्हांला आमच्या देशबांधवांकडून मदत होण्याची बहुतकरून मुळींच आशा नसते. त्यांच्यांत उलट प्रकार असतो. या व इतर अनेक कारणांनीं पाश्चात्य व्यापारीवर्ग बराच गबर असतो व त्या मानानें त्यांची महत्वाकांक्षाही जबर असते. कुबेराला पकडून आणणाऱ्या रावणाची संपत्ती एकीकडे आणि सांप्रतच्या यूरोपीयन व अमेरिकन व्यापारी लोकांची संपत्ती एकीकडे! तरी त्या उद्योगशीलांची हालचाल कमी आहे काय? संसारोन्नति अथवा आत्मोन्नति पेक्षांही एक उच्च, प्रबल, उदात्त व अभिनंदनीय अशी एक उन्नति त्यांचे मनांत नेहमीं घोळत असते. ती उन्नति राष्ट्रोन्नति होय. त्या राष्ट्रोन्नतीसाठीं त्यांचा निश्चय, त्यांचें धाडस, त्यांचें ऐक्य, त्यांचा परस्परविश्वास, त्यांचे अहर्निश प्रयत्न, व

त्यांची शिस्त किती अजब असते, हें आपण प्रत्यहीं पाहत असतों. पण केवळ राष्ट्रोन्नतीसाठीं या गोष्टींत परकीयांचें अनुकरण करणारे आमच्यांत किती सांपडतील? फार थोडे. किंबहुना हाताच्या बोटाइतकेही नसतील! परकीय म्हणजे विदेशी व्यापारी नऊकोटनारायण बनले किंवा आमच्याकडील एखाद्या गोपाळराव मैराळास ते खरेदी करण्यासारखे जरी असले तरी, त्यांची महत्वाकांक्षा काय असते? "आमच्याप्रमाणेंच आमच्या देशबांधवांनीं उद्योगी व श्रीमंत कां होऊं नये?" आणि आमच्याकडे? त्या महत्वाकांक्षेचा पूर्ण अभाव! राष्ट्र म्हणजे काय? त्याचे उन्नतीकरितां आपण काय केलें पाहिजे? आणि राष्ट्रोन्नतीपासून समाज व कुटुंब यांचा काय फायदा असतो? या विचारांचा त्यांचे डोक्याचे आंतील मेंदूंत प्रवेश होईल तेव्हां ना? खावें, प्यावें आणि चैन करावी व फार झालें तर दहा पांच ब्राह्मणभोजनें घालावीं, ही समजूत ज्यांच्या इतिकर्तव्यतेची, त्यांच्या उन्नतीनें तेथें हंसावें कीं रडावें, याचा वाचकच विचार करोत!

आमच्यांत स्वार्थ म्हणजे अप्पलपोटेपणा विलक्षण भरला आहे. आणि हाच आमच्यांत मोठा दोष आहे. हा अक्षम्य दोष आहे. या एका दोषाच्या झाडवस्त्राखालीं बाकीचे आमचे सर्व सद्गुण लपल्यासारखे झाले आहेत. आमच्यांत उच्च मनोवृत्ति आहेत. स्वार्थत्याग आहे, देशाभिमान आहे, राष्ट्राची चाड आहे, कुटुंबाचा अभिमान आहे व पूर्वजांविषयीं पूज्यबुद्धि आहे; सर्व आहेः परंतु एका स्वार्थामुळें—या

अप्पलपोटेपणाच्या धगधग करणाऱ्या अग्नीमुळें—वरील सद्गुणांची राख होऊन गेली आहे. त्यामुळें जन्मास आल्याचें सार्थक कुटुंबपोषण, लग्नकार्यें, स्थावरजंगम मिळकतीचें संपादन व द्रव्यसंग्रह या चार गोष्टी करण्यांत येऊन बसलें आहे. परंतु या चार गोष्टी करण्यांत विशेष पुरुषार्थ नाहीं. त्या तर झाल्याच पाहिजेत. आणि त्या विनभोभाट करून जो यांच्या पलीकडे जाईल म्हणजे जो समाज आणि राष्ट्र यांच्या उन्नतीस आपल्या स्वतःला वाहून घेईल, त्याचेच हांतून आयुष्याचा सद्व्यय होईल व त्यालाच 'वेळेचें महत्व' यथार्थ रीतीनें समजेल. धंदा, कलाकौशल्य, शेतकी, बागाईत, उद्योग, धंदे, विद्यार्जन, ज्ञानार्जन, नीतिवर्धन, देशाभिमान, धर्माभिमान, लोकजागृति, स्वातंत्र्यसंपादन वगैरे अनेक मार्ग या उन्नतीचे आहेत. ज्याला जो मार्ग प्रशस्त व हितकर वाटेल, त्या मार्गानें त्यानें दृढनिश्चयानें पुढें पाऊल टाकण्यास आरंभ करावा. मग त्यांत स्तुति किंवा निंदा कांहीं होवो. तिकडे लक्ष देऊं नये. आम्हीं म्हणतों या प्रकारचे लोक पाश्चात्य राष्ट्रांत पुष्कळ आहेत व ते जो उद्योग हातांत घेतात तो बहुधां राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनेंच हातांत घेतात. नॅव्हिगेशन कंपन्या, रेलवे कंपन्या वगैरेसारख्या संयुक्त मंडळ्या पाहिल्या म्हणजे त्यांच्या प्रस्थापनेंत राष्ट्रोन्नतीचीच ज्योत अधिक जागृत दिसते व ती जागृति आम्हांला कबूल करावी लागते. एरव्हीं या कंपन्या फोडून त्यांचीं शकलें शकलें पाहिलीं म्हणजे जे व्यक्तिविषयक भागीदार

दिसतात, त्यांना तर 'सुखंच मे शयनंच मे' करण्यापलीकडे कांहीं काम नाहीं, अशीच त्यांची स्थिति बहुतकरून दिसून येईल. परंतु राष्ट्रोन्नतीच्या अनिवार उत्कंठेला वश होऊन ते आपली 'वेळ' म्हणजे आपलें आयुष्य याचा व्यय यथायोग्य करीत आहेत, यांत शंका नाहीं. म्हटलें आहे: 'नहि कल्याण कृत्कश्चित दुर्गतिं तात गच्छति.' सारांश, उद्योग करणें म्हणजेच 'वेळेचें महत्व' जाणणें होय. उद्योगाचें महत्व किती असतें, हें सर वाल्टर स्कॉट चांगलें जाणत असे. नुसत्या त्याच्या कादंबऱ्या पाहिल्या तर, त्याच्या उद्योगमग्नतेची तेव्हांच कल्पना होईल. या स्कॉटला चार्लस् नांवाचा एक मुलगा होता. त्यानें त्याला पुढील आशयाचें पत्र लिहिलें होतें:–"आपण कोणत्याही स्थितींत असलों तरी, आपण उद्योग केला पाहिजे, अशी ईश्वरीयोजना दिसते. तेव्हां त्वां उद्योगमग्न असणें अवश्य आहे. निढळाच्या घामानें भाकरी मिळविणाऱ्या शेतकऱ्यांपासून तों क्रिकेटपटु बनणाऱ्या एखाद्या लॉर्डापर्यंत–कोणालाही काय? श्रम केल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. कारण श्रमांवांचून त्या भाकरीला व क्रिकेटला गोडी नाहीं व मौजही नाहीं.........ज्ञानाचीही गोष्ट तशीच आहे. शेत नांगरल्याखेरीज जसें धान्य येत नाहीं, तद्वत् श्रम केल्याखेरीज बुद्धि विकास पावूं शकत नाहीं. म्हणून तूं आपलें ज्ञान जितकें वाढविशील तितका तुझा त्यांत फायदाच आहे. उद्योगांत रत ऐस. आयुष्याचा म्हणजे 'वेळे'चा चांगल्या कामीं व्यय कर. आणि लक्षांत ठेव कीं, जर तूं

आपला तारुण्यरूपी वसंतकाळ व्यर्थ दवडलास तर, तुझ्या भावी सुखाचा उन्हाळा झालाच म्हणून समज; मग वृद्धापकाळीं तुझेवर दुःखाचे आकाश कडाडलें किंवा त्यांतून दैवदुर्विलासाची प्रळयवृष्टी होऊं लागली तर, मग जन्मास आल्याचें सार्थक तें काय ?"

स्कॉटप्रमाणें प्रख्यात कवि सौदी हाही मेहनती होता. शाळेंत असतांना त्यानें आरिआस्टो, होमर व ओव्हिटसारख्या काव्यांच्या भाषांतरांशीं चांगलाच परिचय करून घेतला होता. इतकें करूनही त्याला एकदां असा पश्चात्ताप झाला कीं, 'छे ! जन्मास आल्यासारखें म्यां कांहींच केलें नाहीं ! माझ्या आयुष्याचीं एकोणीस वर्षें व्यर्थ गेलीं ! कालगतीच्या महापुरांत माझी एकोणीसी विनाकारण वाहून गेली ! कांहीं केलें तरी ती मला पुनः म्हणून मिळणार नाहीं ! न मिळो ! पण एवढ्या वयांत माझ्या देशाला अथवा समाजाला माझा कांहीं तरी उपयोग व्हावयाचा होता; पण तोही नाहीं ! केवढी ही दुःखाची गोष्ट ! पांखरांपासून शेताचें संरक्षण करणाऱ्या गोफणगुंड्याला जी योग्यता आहे, तीसुद्धां मला नाहीं ! कारण आळसानें माशा मारीत जें अन्न मीं खातों, तें अंशतः त्याच्या श्रमाचें फळ आहे. हा सौदी उद्योगी असतांही त्याला असा पश्चात्ताप झाला आणि आम्ही निरुद्योगी, आळशी व कर्तव्यपराङ्मुख असूनही आमच्या मांवीं सुद्धां ती गोष्ट नाहीं ! ! असो.

राष्ट्रोन्नतीचा मूळ पाया संसारोन्नति आहे. आणि संसार म्हटला कीं, तेथें नवराबायको अथवा स्त्री व पुरुष आलेच !

तेव्हां उद्योग म्हटला म्हणजे तो पुरुषामागें असतो आणि बायकांमागें असत नाहीं असें नाहीं. जपानांत पुरुषांपेक्षां स्त्रियाच अधिक उद्योगी आहेत आणि म्हणूनच तें राष्ट्र आजला चांगल्या गोष्टींत अनुकरणीय झालें आहे. जी स्त्री संसारांत दक्ष असते, तिचा उद्योग तळहाताचा मळ असतो. घरांत काय आहे काय नाहीं, आपला खर्च किती, केलें पाहिजे काय, वागलें पाहिजे कसें, आणि दोन पैसे शिलक पाडून घरांतील पुरुषांना किंवा विशेष प्रसंगीं स्वतः आपल्याला, राष्ट्राच्या किंवा समाजाच्या उपयोगीं पडतां येईल कसें ? या गोष्टीकडे तिचें नेहमीं लक्ष असणें अवश्य आहे. आणि कांहीं शाहण्या स्त्रिया या सगळ्या गोष्टी लक्ष्यांत घेऊन त्याप्रमाणें त्या आपली कर्तृत्वशक्ति व व्यवहारिक चातुर्य पुरुषांचे प्रत्ययास आणून देतात. यांनाच आम्ही व्यवहारज्ञ म्हणतों. सद्वर्तनाची किंमत काय हें त्या चांगलें जाणतात आणि हा भवसागर तरून जाण्यास प्रेमळ व सद्गुणी दांपत्य हीच एक उत्तम नौका होय, अशी त्या आपली खातरी करतात.

वस्तुतः संसाराच्या राज्यांत खरें राज्य करण्याचा अधिकार काय तो स्त्रीचा. तिचें राज्य साऱ्या घरांत असतें आणि तें चांगलें करून दाखविण्यास तिचे अंगीं वरील गुणांचें वास्तव्य असावें लागतें. तशीच पुरुषाचीही गोष्ट आहे. ज्या तत्वावर घरांतील उद्योगधंदे चालून स्त्रीला आपल्या वेळेचें, आयुष्याचें अथवा जन्माचें सार्थक करून घेतां येतें, त्याच तत्वावर पुरुषालाही बाहेरचे उद्योगधंदे चालवून देहाचें सार्थक करून

घेतां येतें. मात्र पुरुषांचे अंगचे गुण प्रगट होण्यास त्यांना बायकांपेक्षां पुष्कळ प्रांत असतो. मग तो प्रांत व्यापारी, सामाजिक अथवा राजकीय कोणताही असो; त्यालाही चहूं-कडे सारखेंच दक्ष राहिलें पाहिजे; व तारतम्य, धूर्तता, वळण, व्यवहार, स्वार्थ, परमार्थ, मानमान्यता आणि कीर्ति त्यानें वाढवीतच गेलें पाहिजे; नाहींतर त्यानें ' वेळेचें महत्व ' जाणलें नाहीं असें होईल. पण सत्संगतीच्या पुण्यनदींत वाहवत जाऊन शेवटीं जो उद्योगरूपीं महासागरास मिळतो त्याला मग

सत्यसंकल्पाचा । दाता भगवान्
सर्व करी पूर्ण । मनोरथ ॥

या साधुवाक्याचा पूर्ण अनुभव आल्याखेरीज राहत नाहीं.

मनुष्य उद्योगी असला तर, त्याचें मन आणि शरीर चांगलें असतें. उद्योगानें मनुष्याचे अंगांत चैतन्य जागृत राहतें आणि शरीरांतील अवयवांला ताजें, भरपूर व निरोगी रक्त मिळाल्यानें मनुष्य निरोगी बनतो. आरोग्य आहे तर उद्योग आहे व उद्योग आहे तर आरोग्य आहे. बीजांकुर न्यायानें या दोहोंचा संबंध कसाही असला तरीं, जेथें उद्योग व आरोग्य ही जोडी आहे तेथेंच खऱ्या सुखाचा झरा वाहतो, तेथेंच आत्मानंद विहरत असतो आणि तेथेंच आत्मोन्नतीला अवकाश सांपडतो. कित्येक, मजुरांसारखे खपत असतील व कित्येक मुख्य न्यायाधीशाच्या खुर्चीवर विराजमान होत असतील, पण त्यावरून पहिले उद्योग करतात

आणि दुसरे धरणीला भारभूत होतात, असें म्हटलें तर थोड्या येवढी चूक होईल. पूर्वमहासागर बाह्यतः शांत दिसतो खरा, पण चपळ ओढ्याच्या तीव्र गतीपेक्षांही अनंतपट तीव्र असणाऱ्या गती त्याचे पोटांत रात्रंदिवस आपलें कार्य अबाधित करीत असतात. त्याचप्रमाणें न्यायाधीश, दिवाण, गव्हरनर, प्रधान, राजे वगैरे मोठमोठ्यांची गोष्ट होय. मजुरांचे हातपाय कष्टाखालीं जितके खपतात, त्यापेक्षांही या मोठमोठ्या लोकांचे मेंदु मानसिक कष्टांखालीं अधिक मेटाकुटीस येतात! मजुरांचे उद्योगावर फार झालें तर, एका दोघांचें अथवा एखाद्या कुटुंबाचें बरें वाईट अवलंबून असेल. परंतु जे सत्ताधीश, न्यायाधीश, सेनाधीश व राष्ट्राधीश आहेत अथवा लोकांचे अग्रणी आहेत, त्यांचे मानसिक-कष्टांवर तर अनेक प्रांत मिळून झालेल्या अवघ्या राष्ट्रांचेंही बरें वाईट अवलंबून असतें. म्हणून शारीरिक कष्टांपेक्षां मानसिक कष्टांची योग्यता मोठी असते व ती अंगी आणण्यास पूर्वसंचित, सत्संग, सदाचरण, एकनिष्ठा, स्वातंत्र्यप्रीति, विद्वत्ता वगैरे अनेक गुणांचा जवळ सांठा असावा लागतो.

३५५ १०।७

## ६ आयुर्व्यय.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

सर्वांत अधिक प्रिय तुम्हांला काय? प्राण. तर मग आयुष्याचा व्यर्थ नाश करूं नका. कारण प्राणरूपी रत्नाचें आयुष्य हें कोंदण आहे. किंबहुना प्राण आणि आयुष्य हें एकच म्हटलें तरी चालेल. म्हणून जेणेंकरून तुम्हांला आयुष्याचा सदुपयोग करतां येईल असे सदुद्योग करा. आळसांत मोक्ष नाहीं. नरक आहे. झोंपच घ्यावयाची असेल तर, मेल्यानंतर खुशाल घ्या. तुम्हांस ती विपुल मिळेल आणि तींतून पुन्हां तुम्हांला उठवावयाला खात्रीनें कोणी येणार नाहीं! मानवी आयुष्य व मानवी जन्म जागृतीसाठीं आहे. जो जागृति धारण करील तोच इष्ट फळ मिळवील. आजचें कर्तव्य आजच करा. तें उद्यांवर टाकूं नका. कारण ‘ उद्यां किती अडचणी येतील ’ हें कोणीही सांगूं शकणार नाहीं आणि त्या आल्या तर तुमचें कर्तव्य तसेंच राहील. तशांत आणखी एका घटकेनें तुमचें काय होईल; याचीही कल्पना नसल्यानें दिवस रिकामा घालवूं नका. विश्रांतींत मनाला सुख, समाधान व प्रसन्नता पाहिजे असेल तर, आयुष्याचा म्हणजे वेळेचा सदुपयोग करा. आजच्या एका दिवसाची किंमत उद्यांच्या दोन दिवसांपेक्षां अधिक आहे.

वेळेची किंमत जाणणारा मनुष्य आपल्या शब्दाची किंमत जाणतो व तो दुसऱ्याच्याही गैरसोईकडे नेहमीं लक्ष देतो. कामांत आळस किंवा हलगर्जीपणा केल्यानें किती नुकसान होतें व तत्परता राखल्यानें किती उपयोग होतो, याचा त्याला पुरा अनुभव असतो. कामांत अळंटळं केली व तें उद्यांवर ढकललें तर घोंटाळा झालाच म्हणून समजावें. म्हणून शहाणीं माणसें आपलें काम ताबडतोब करितात आणि मूर्ख लोक आपलें काम "करूं सावकाश" असें म्हणतात! कामांत चालढकल केल्यानें काम वाढतें व त्याचा मग बोजा वाटतो.

वेळ हा पैसा आहे. तेव्हां त्याचा विनियोग आपण जपून केला पाहिजे. परंतु आपण करतों काय? तर अगदीं उलट. वेळेचा व्यय आपलेकडून वाटेल तसा होतो. आणि या आपल्या उधळपट्टीबद्दल आपल्याला शेवटीं—'जन्मास येऊन केलें काय? तर कांहीं नाहीं!'—असा पश्चात्ताप करावा लागतो. म्हणून खरे उद्योगी लोक आपला वेळ कधींही वायां दवडीत नाहींत.

आपण अव्यवस्थित राहिलों व तसें राहण्याची कोणाला संवय असली, तर त्यांची केवढी हानि होते ती पहा. त्यांना वाटतें एका घटकेनें काय होतें? पण काळ त्यांच्या आयुष्यांतली तेवढीच घटका चोरतो, पुढें प्रहर चोरतो व नंतर दिवस चोरतो! हा रोजचा खर्च ऊर्फ काळाची चोरी त्यांना आरंभीं क्षुल्लक वाटत असेल. पण अशा रीतीनें त्यांच्या आयुष्याचीं किती तरी वर्षें व्यर्थ जातात, याचा त्यांनीं कधीं विचार केला आहे काय?

म्हणून मनुष्याचे अंगीं नियमितपणा असणें जरूर आहे. नियमितपणाचें महत्व अजब आहे. ज्याचे अंगीं नियमितपणा असेल, त्याला वाटेल त्या धंद्यांत, उद्योगांत व कार्यांत यश येईल. नियमितपणानें मनाला शांति व सुख मिळतें. आणि अनियमितपणानें मनाला तितकाच त्रास व असमाधान होतें. जो व्यवस्थित नसतो, त्याचे मागें सदां घाई असते. तो एकीकडे बोलतो, दुसरीकडे चालतो, आणि भलतीकडेच बहकतो! याचें कारण नियमितपणा राखण्याचा अंगीं वकूब नसतांही पुष्कळांस अमुक ठिकाणीं अमुक वाजतां भेटण्याचें वचन द्यावयाचें आणि तें मोडण्याची वेळ आली म्हणजे आतांच वर सांगितल्याप्रमाणें त्याची धांदल व्हावयाची! यासाठीं नियमितपणा अंगीं जडवून घेण्याचा प्रत्येकानें प्रयत्न करावा. नियमितपणानें समाजावर किंबहुना राष्ट्रावर वजन पडतें. आपल्याकडे असे महात्मे कै० रा० सा० विश्वनाथ नारायण मण्डलीक व इंग्लंडांत मुख्य प्रधान विल्यम ग्लॅडस्टन होऊन गेले. या पुरुषांच्या नित्यक्रमावरून कित्येक लोक आपलीं घड्याळें लावीत असत, असें म्हणतात! नियमितपणानें वागणारे पुरुष इतरांसही स्वतःप्रमाणें करून सोडतात. कारण त्यांचा वर्तनक्रम पाहून त्यांकडे येणारेजाणारेही आपोआप त्यांचेंच अनुकरण हळूं हळूं करतात. नाहीं तर नियमितपणानें वागणारांशीं त्यांच्याशीं संबंध ठेवूं इच्छिणारांचें अगर त्यांचे मार्फत आपलें काम करवून घेणारांचें कधींच पटावयाचें नाहीं. म्हणून त्यांना नियमित झाल्याशिवाय गत्यं-

तर नाहीं. न बोलतां, न चालतां अथवा न शिकवितांही ज्याचा प्रभाव सामान्य जनावरही पडूं शकतो, त्या नियमितपणाचें वर्णन करावें तितकें थोडेंच होणार आहे. सारांश अमुक वेळीं अमुक गोष्ट करावयाची अथवा अमक्याला भेटावयाचें एकदां ठरलें म्हणजे तें करणें नियमिततारूपी सावकाराचें देणें समजून त्या देण्याची तेव्हांच फेड केलेली बरी. आणि असाच करारीपणा प्रत्येक गोष्टींत जो ठेवील तोच 'वेळ' म्हणजे काय, हें समजून आयुष्याचा पुढील बिकट मार्ग सुगम करील.

एकादी वस्तु हरवली तर ती सांपडूं शकेल, आपल्या घरांतला एखादा जिन्नस चोरीस गेला तर त्याचा तपास लागून तो मिळूं शकेल, आणि कधीं जाणून बुजून अथवा कधीं अवश्य म्हणून खर्च केलेला पैसा आपण पुन्हां कमाऊं शकूं. परंतु एकदां खर्च केलेली किंवा मुद्दाम वायां दवडलेली वेळ पुन्हां परत मिळेल, असें कधींही घडणें नाहीं. म्हणून थोर थोर महात्मे आपलें बहुमोल आयुष्य कधींही व्यर्थ दवडीत नाहींत. तुम्ही त्यांच्याकडे केव्हांही जा, ते कोणत्या ना कोणत्या तरी उद्योगांत असलेले सांपडतील. आणि जेव्हां ते मुळींच रिकामे बसलेले आढळतील, तेव्हां त्यांचें मन तरी कसल्याशा गहन विचारांत असलेलें दिसेल. गहन विचारांत एकाग्र मन असणें ही एक प्रकारची तपश्चर्या आहे. तपश्चर्येनें परमेश्वर सुद्धां प्रसन्न करून घेतां येतो. पण त्याला अभ्यास पाहिजे. अभ्यासाला उद्योग लागतो,

उद्योगाला किंवा कर्तव्य करावयाला 'वेळेचें महत्व' कळावें लागतें आणि इतक्या सर्व गोष्टीला कृतनिश्चय व आज्ञाधारकपणा यांचा पाया लागतो. म्हणून प्रत्येकानें आयुर्व्ययाचे कामीं फारच दक्ष राहिलें पाहिजे. राष्ट्राचा अभ्युदय घटकाभर एकीकडे राहो. पण ज्याचा त्यानेंच आपला अभ्युदय करून घेण्याचें मनांत आणलें तर त्याचें पहिलें कृत्य अथवा कर्तव्य आयुष्याचा सद्व्यय करणें होय, एवढें जाणून जर तो तसें करूं लागला तर, मग आणखी काय पाहिजे?

---

## ७. कर्तव्य.

In the world's broad field of battle,  
In the bivonac of life,  
Be not a dumb driven cattle;  
Be a hero in the strife.

—*Longfellow.*

### आर्या.

संसार दों दिसांचा, यश जोडी जो कुलीन तोचि तरे ।  
घ्यावें बरें म्हणोनि, स्वपरसुखीं हें कुलीनतोचित रे ॥  
सुकृतातेंचि स्मरति, न कुकृतातें, याचि साधुरीतीची ।  
रुचि रसिकां न सुधेची, कीं केवळ अल्प माधुरी तीची ॥

—मोरोपंत.

'कर्तव्य' या शब्दाची व्याप्ति मोठी आहे. या पृथ्वीच्या पाठीवर जितके लोक आहेत, त्या सर्वांचीं कर्तव्यें त्यांच्या परिस्थित्यनुरूप वेगळीं वेगळीं आहेत. तथापि, धर्माचीं तत्वें जशीं स्थूल असून तीं सर्व काळीं सर्व ज्ञातींच्या सुज्ञ मनु-

वा. क्र. ३५५

ष्यांस मान्य असतात, तद्वत् राष्ट्रीय कर्तव्य अथवा त्याचीं तत्वें सुद्धां बहुतेक सर्वांस सारखींच मान्य असतात. उद्योग करणें म्हणजे ‘कर्तव्य’ नव्हे. उद्योग करणें हा मनुष्यस्वभाव आहे. ज्याचें त्यानें पोट भरणें व परिधान करण्यासाठीं चांगलीं चांगलीं वस्त्रें खरेदी करणें याला सुद्धां कोणी पाहिजे असल्यास उद्योग म्हणूं शकेल. पण कर्तव्य नाहीं. आपले स्वतःचे बरोबर जो दहांचें पोट भरील आणि स्वतः प्रमाणेंच कुटुंबांतील इतर माणसांचा जो परामर्ष घेईल तो मात्र आपलें कर्तव्य करील. महा पूर आलेल्या नदीचे कांठीं एक अट्टल पोहणारा बसलेला आहे व पलीकडे एक अनाथ मनुष्य बुडत आहे. तेव्हां त्या ‘बुडत्यास हात देणें’ हें त्या पोहणाराचें कर्तव्य आहे. नदींत नुसतें स्नान करून घरीं जाणें त्याचें कर्तव्य नव्हे. शाळेंत जाऊन विद्याभ्यास करणें, कारखान्यांत जाऊन कलाकौशल्यांत प्रवीण होणें, दुकानावर बसून विक्री करणें अथवा एकाद्या ऑफिसांत जाऊन खरडे घासणें वगैरेस ‘उद्योग’ म्हणतां येईल. परंतु विद्वान् होऊन अहेतुक बुद्धीनें विद्यादान करणें; कल्पक शिल्पी होऊन अनेक कारागीर तयार करणें, व्यापारधंद्यांत शिरून देशांतील उद्योगधंदे वाढविणें आणि कचेरींत खर्डे घाशीत असतांही कैलासवासी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानड्यांसारख्यांचा कित्ता गिरविणें, हें त्या त्या परिस्थितींतील लोकांचें ‘कर्तव्य’ आहे. भर्तृहरि म्हणतोः—

श्रोतं श्रुतेनैव न कुण्डलेन
दानेन पाणिर्न तु कङ्कणेन ।
विभाति कायः करुणापराणाम्
परोपकारैर्न तु चन्दनेन ॥

**भावार्थ**–शास्त्रांच्या श्रवणानेंच कान शोभतात, कुण्डलांनीं शोभत नाहींत. आणि दयाशील मनुष्याचें शरीर परोपकारानेंच शोभतें; चन्दनाच्या उटीनें शोभत नाहीं!

येथें कान, हात आणि शरीर यांचा नेहमींचा उद्योग स्वतःला शोभायमान करून घेणें हा आहे. परंतु शास्त्रश्रवण करणें, दान करणें आणि परोपकार करणें हीं त्यांचीं कर्तव्यें आहेत.

त्याचप्रमाणें कुटुंबें, समाज आणि प्रांत हीं ज्यांवर अवलंबून असतात, त्यांचींही कर्तव्यें निरनिराळीं असतात. इतकेंच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या मागें तिच्या परिस्थितीस अनुसरून कर्तव्य हें लागलेलेंच असतें. जेव्हां राष्ट्रावर एखादें संकट येतें तेव्हां सर्व प्रकारच्या कर्तव्यशील लोकांचें लक्ष्य तें निवारण करण्याकडे लागलेलें असतें. कारण राष्ट्राच्याच उन्नतीवर व अवनतीवर सर्व देशाची उन्नति व अवनति अवलंबून असते. म्हणून राष्ट्रीयसंकट निवारण्याची ज्यांचेवर विशेष जबाबदारी असते म्हणजे तें टाळणें ज्यांचें कर्तव्य होऊन बसतें त्यांचेकडे त्या राष्ट्राचें–किंबहुना सर्व जगाचें लक्ष्य लागून राहतें. आणि अशा वेळीं जो आपलें कर्तव्य बजावितो, तोच जन्माचें सार्थक करतो व सर्व जग त्याची वाहवा करितें.

हत्तीएवढ्या रशियाला मुंगीएवढ्या जपानानें जर्जर करून सोडलें. तरी बाल्टिक फ्लीटच्या जोरावर स्वसामर्थ्याची रशियाची वल्गना चालूच होती आणि सर्व जगालाही वाटत होतें कीं, जें अवाढव्य बाल्टिक फ्लीट आज सहा सात महिने आफ्रिकेला प्रदक्षणा घालून जपानजवळच दक्षिण दिशेस एकाएकीं प्रगट झालें, त्याचा पराभव अडमिरल टोगोच्यानें कसला होतो? त्या बुड्ढ्यानें तर या 'बाल्टिक फ्लीट'ला अडथळा करण्यासाठीं दोन अडीच महिन्यांपूर्वी जी दडी दिली होती तिचा ठाव अखेरपर्यंत कोणालाही लागूं दिला नाहीं! फार काय? पण घरच्या माणसांविषयीं आतुर असणाऱ्या हाताखालील सैनिकांचा सुद्धां पत्रव्यवहार त्यानें अगदींच बंद पाडला! त्यावरून टोगोविषयीं अनेकांनीं अनेक तर्क केले व ते त्यांत गर्क आहेत, तोंच रशियाचें 'बाल्टिक फ्लीट' घेऊन अडमिरल रोझडाव्हेन्स्की यानें त्सुशिमा बेटांतून आपला मार्ग काढला! जणूं काय आपण अडमिरल टोगोच्या हातावर तुरी दिल्या व जपानावर कायमचा पारतंत्र्यास्त्रप्रयोग केला! परंतु अडमिरल टोगो झोपीं गेले नव्हते. ते व त्यांचें 'फ्लीट' डोळ्यांत तेल घालून 'बाल्टिक फ्लीटची'च इतके दिवस दडून वाट पाहत होते. सावज आपल्या टप्यांत आल्यावर वाघ जशी त्यावर चवताळून उडी टाकतो, त्याचप्रमाणें 'बाल्टीक फ्लीट' टोगोचे टप्यांत येतांच त्यांनीं आपल्या कर्तव्यतत्पर व देशभक्त 'फ्लीट'ला म्हणजे लढाऊ जहाजांना व दर्यावर्दी योद्ध्यांना इशारत दिली आणि 'आज विजयश्री

तुमची आहे, तिला तुम्ही पटकावा' असें साल्हाद प्रोत्साहन देतांच रामाच्या बाणाप्रमाणें अड्मिरल टोगोच्या दर्यावर्दी योद्धयांनीं मी मी म्हणत एकदम लगट करून अजस्त्र म्हणून गाजत असलेल्या त्या 'बालटीक फ्लीट'चा पार धुव्वा उडविला! कित्येक जहाजें रसातळास पोंचविलीं, कित्येक खिळखिळीं करून लढण्याच्या निरुपयोगीं करून सोडलीं, कित्येक सायसंगीन काबीज केलीं व शेवटीं झारच्या आशेचा प्राणच अशा रोझडाव्हेन्स्कीला चतुर्भूज करून जपानचा अधिपति जो शाहजादा मिक्याडो त्याचे अग्रभागीं टोगोनें उभें केलें! जपानची उन्नति अथवा अवनति, स्वातंत्र्य अथवा पारतंत्र्य आणि लौकिक अथवा दुर्लौकिक, याच आणीबाणीच्या वेळेवर अवलंबून होता. तिची सर्व जोखीम जपानच्या राष्ट्रानें टोगोवर सोपविली होती. परंतु शेवटीं त्या कर्तव्यदक्ष दर्यावर्दी सेनापतीनें आपलें कर्तव्य चोख बजाविलें व जपानच्या अभ्युदयाचा, स्वातंत्र्याचा आणि लौकिकाचा झेंडा कायम फडकत ठेविला!!! याचें नांव कर्तव्यपरायणता! आणि यालाच म्हणतात वेळेचें महत्व! तें त्यानें पुरें जाणलें होतें. रोझडाव्हेन्स्कीकडील प्राणहानि सुमारें चौदा हजार व टोगोकडील सरासरी दीडहजार झाली.

मुकडेनची लढाईही मोठी भयंकर झाली. भारतीययुद्ध झाल्यानंतर येवढा रणसंग्राम कधींच कोठें झाला नसेल. रशियाचा सेनापति क्युरोप्याटकीन् व जपानचा सेनापति ओयामा हे या निकराच्या संग्रामाची आपापल्याकडून बरेच दिवस

सारखी तयारी करीत होते. क्युरोपॅटकीनचें सैन्य उंच, धिप्पाड, मांसाहारी, काटक व निर्दय आणि ओयामाचें सैन्य ठेंगणें, किरकोळ, वनस्पत्याहारी, चपळ व सदय होतें. ओयामाचा विचार क्युरोपॅटकीनला घेरून कोंडावा व क्युरोपॅटकीनचा विचार ओयामाचे हातावर तुरी देऊन साधल्यास त्याचा पराभव करावा, असा होता. दोन्हींकडचें मिळून सरासरी दहा लक्ष सैन्य होतें. ओयामाचे जनरल ओकू, जनरल कुरोकी, व जनरल नोडझूसारखे रथी अति-रथी होते व ते सर्व कर्तव्यदक्ष होते. लढाईचें तोंड लागलें. उभय दलांतून बंदुकांच्या गोळ्यांची वृष्टी होऊं लागली. तोफांचा असह्य भडिमार सुरू झाला. हजारों वीरांच्या रक्तांच्या तांबड्या लाल नद्या वाहूं लागल्या. आणि जपानी सैन्य रशियन सैन्याची सारखी कत्तल करीत त्याला मागें हटवीत चाललें! एकीकडून ओकू, दुसरीकडून कुरोकी व समोरून नोडझू यांचीं सैन्यें क्युरोपॅटकीन्ला घेरूं लागलीं! तथापि शाबास क्युरोपॅटकीन्ची! त्यानेंही विशेष लगट करून जपानी योद्ध्यांस कांहींसें मागें हटविलें व विजयश्री जरा गोंधळल्यासारखी केली! पण इतक्यांत पोर्ट आर्थरवर जपानचा विजयध्वज फडकाविणारा वीरमणी जनरल नोगी हा अकस्मात ओयामाचे कुमकेस आला! तें पाहून धोरणी क्युरोपॅटकीन् चपापला व त्यालाही गोंधळल्यासारखें झालें! शेवटीं संधि साधून तो आपल्या मुबलक सैन्यासह एका खिंडींतून हरबीनकडे परत चालता झाला! त्याचा नोगीनें

बराच पाठलाग केला. पण शेवटीं त्यास परत यावें लागलें! या भयंकर रणकंदनांत क्युरोपॅटकीनचे अडीच तीन लाख लोक धारातीर्थी पडले!! पण ऐन वेळ साधली ती नोगीनें. त्यानें आपल्या कर्तव्यांत हयगय केली असती तर, कदाचित् लढाईचा परिणामही निराळाच झाला असता! म्हणून 'वेळेचें महत्व' जाणणें आणि तसें करणें हें कर्तव्यदक्ष मनुष्यालाच काय तें शक्य आहे.

असें म्हणतात कीं, हिंदुस्थांतील जे लोक व्यापारधंद्यांचे निमित्तानें ट्रान्सव्हालमध्यें जाऊन राहिले, त्यांना हुसकून लाविण्याचा मूळ पाया प्रेसिडेंट क्रूगर यांनींच घातला! इतकेंच नव्हे तर आफ्रिकेंतून या लोकांना हांकलून लावणें माझें कर्तव्य आहे असेंही ते म्हणत. कारण इंग्रज लोक यांना पक्षपातानें वागवितात. यांचेवर नवीन करांचें ओझें लादतात आणि यांचें घर धुवून ते इंग्लंडची भर करितात! असें असतांही हेंच इंडियन आफ्रिकेंत येऊन पुन्हां इंग्रजांचेच गुलाम होऊन राहतात! तेव्हां अशा स्वाभिमानशून्य लोकांना आश्रय देण्यापेक्षां त्यांचें मुखावलोकनही न करणें माझें कर्तव्य आहे! आणि आजची आपल्या तेथील देशबांधवांची स्थिति पहातां परलोकवासी क्रूगरांचें करणें वेळेस अनुसरून होतें असें कबूल करावें लागतें. रावसाहेब पेशव्यांच्या हुकमावरून झांशीची राणी वीरवती लक्ष्मीबाई हिच्या कुमकेस वीस हजार सैन्य घेऊन येणाऱ्या अश्वगामी तात्या टोपीला 'वेळेचें महत्व' कळलें असतें अथवा 'कर्तव्या'ची त्याला

जराशी चाड असती तर मूठभर सैन्य घेऊन छापा घालणाऱ्या सर ह्यू रोझपुढें त्याला खात्रीनें पळ काढावा लागला नसता. कर्तव्यतत्पर मनुष्य 'वेळेचें महत्व' जाणतो व अशा मनुष्याला साधनें व अनुकूलता जरी थोडी असली तरी तो आपले कर्तव्यांत चुकत नाहीं. सर ह्यू रोझ अशाचपैकीं होता. आणि तात्याटोपी त्याचेचसारखा 'कर्तव्य'तत्पर व 'वेळेचें महत्व' जाणणारा असता तर त्यानें सर साहेबांच्या मूठभर सैन्याची तेव्हांच चटणी केली असती. त्याचप्रमाणें शिंद्याचें ग्वाल्हेर सर केल्यावर शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवून मोर्चेगिरी करावयाची ती न करतां व झांशीची राणी नको नको म्हणत असतांही रावसाहेब स्वतःस राज्याभिषेक करवून ब्राह्मण भोजनांत गर्क झाले ही त्यांनीं अक्षम्य चूक केली. त्या आणीबाणीच्या वेळीं असें करणें त्यांचें कर्तव्य नव्हतें. त्या 'वेळेचें महत्व' विशेष होतें व तें त्यांनीं जाणावयाचें होतें. परंतु त्यांच्या शोचनीय कर्तव्यपरांगमुखतेनें त्यांनीं आपल्याबरोबर आपल्या राष्ट्रासही अधोगतीच्या खोल खोल-अती खोल नरक कुंडांत बुडवून ठेविलें! ! ! कर्तव्य न बजाविण्याचा व 'वेळेचें महत्व' न जाणण्याचा केवढा हा भयंकर परिणाम?

ज्यांनीं आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजाविलें अशा स्त्रीपुरुषांचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आहेत. तीं वाचून त्यांचें नीट मनन करणें व त्यापासून होणाऱ्या ज्ञानाचा स्वतःला फायदा करून घेणें हें प्रस्तुतच्या व पुढच्या पिढीचें कर्तव्य आहे. पण आज जे महात्मे आपल्या देशाच्या उन्नतीकरितां

रात्रंदिवस झटत आहेत व ज्यांचा कधीं लोकांकडून तर कधीं अधिकाऱ्यांकडून छळ होत आहे, तथापि अंगीकृत कार्यापासून जे तिळमात्र परावृत्त होत नाहींत ते नामदार दादाभाई नवरोजी, सुरेंद्रनाथ बानर्जी, बाळ गंगाधर टिळकप्रभृति देशभक्त आपलें कर्तव्य कसें चोख बजावीत आहेत हें आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. असो.

वरील अल्प विवेचन स्थूलमानानें राष्ट्रीयदृष्ट्या झालें. तथापि, व्यावहारिक दृष्टीनेंही 'कर्तव्या'कडे पाहणें या स्थळीं अप्रासंगिक होणार नाहीं. करितां त्याचींही एक दोन उदाहरणें देऊन 'कर्तव्य' हें सदर आटोपूं.

आजकाल दूरचा प्रवास बहुतेक आगगाडीनें होतो. ही आगगाडी बहुतेक वेळेवर जाते व येते. तिचें वेळापत्रक आगाऊच प्रसिद्ध झालेलें असतें. आणि कित्येक उतारू त्याची माहितीही करून घेत असतात. तथापि, वेळेवर व्हावयाचा तो 'फार्स' बहुतकरून होतो. स्टेशनचे आंत गाडी येतांच कित्येक उतारू तिकिट मास्तराचे भोंवतीं तिकिटांसाठीं ओरड करितात. पैकीं ज्यांना तिकिटें मिळतात ते आपल्याकडून धांवाधांव व पळापळ करीतच असतात. ती इतकी कीं एखादे वेळीं कोणी आगगाडीला नमस्कारही घालतात!!! तशांत जर ती स्वारी स्थूलदेही, लंबोदरी आणि गजगामी असली तर ती हास्यरसाची घटकाभर सोज्वल प्रतिमाच बनते! एकीकडे पागोटें आणि गांठोडें भलतीचकडे! इतकें होऊनही [illegible]वटीं आलेली गाडी जातेच. पण 'वेळेच्या मह-

त्या कडे लक्ष दिलें म्हणजे असें झाल्यास आश्चर्य नाहीं. शेवटीं दुसरी गाडी येईपर्यंत त्यांना तेथेंच रिकामा वेळ घालवीत बसावें लागतें. शहाणे लोक या वेळेचा कितीतरी चांगला उपयोग करतील? परंतु गेलेल्या वेळेची व त्याबरोबर संपलेल्या आयुर्मानाची ज्यांना कल्पनाच नाहीं, त्यांना त्याचें काय?

पत्रें व पत्रोत्तरें यांचीही गोष्ट अशीच आहे. पत्र आल्याबरोबर दुसऱ्या डाकेनें त्याचें उत्तर दिलें व तें ठिकाण तार ऑफिस अगर आगगाडीचे मानानें फारसें लांब नसलें तर तें वेळेवर—ऐन वेळेवर—सुद्धां पोंचणें शक्य असतें. पण कधीं कधीं वेळेवर उत्तर पाठविण्याचें केवळ हयगयीनें म्हणजे 'वेळेचें महत्व' न जाणल्यानें जेथें एका पैशाच्या कार्डानें अगर अर्धा आण्याचे पाकीटानें काम होण्याजोगें असतें तेथें जरूर म्हणून तारेकरितां रुपया दोन रुपये खर्च करावे लागतात! शिवाय पत्राप्रमाणें तारेंतील मोजक्या शब्दांत स्पष्ट खुलासा होत नाहीं तो नाहींच! बरें, हे रुपया दोन रुपये खर्च करूनही आपल्याच देशांत राहते तर, पत्रोत्तरांत केलेला हलगर्जीपणा कांहीं तरी क्षम्य असता; पण ते जातात साता समुद्राच्या पलीकडे! आणि असे रुपया दोन रुपये अवघ्या हिंदुस्थानांतून रोज किती जात असतील तें परमेश्वरास ठाऊक! तेव्हां या हलगर्जीपणास क्षम्य कसें म्हणावें?

**विद्यार्थ्यांचा अभ्यासः**—विषय कोणताही असो. मन लावून विचारपूर्वक थोडा अभ्यास केला म्हणजे तो चांगला लक्षांत राहतो. प्रत्येक विषयाकडे नियमित अल्प वेळ आणि दृढनिश्चयपूर्वक लक्ष दिलें व तोच क्रम रोजचे रोज चालू ठेविला तर विश्रांतीचा वेळ करमणुकींत घालूनही तोच थोडा थोडा अभ्यास करणारा करारी मुलगा परीक्षेंत बहुधां वर नंबर पटकावतो; पण परीक्षेच्या आधीं जे विद्यार्थी आज पाहूं, उद्यां पाहूं, करतात आणि परिक्षेला महिना दोन महिने राहिले म्हणजे सारखी घोकंपट्टी सुरूं करतात, त्यांना परीक्षेंत बहुतकरून यश येत नाहीं. कारण त्यांचे भरंवशाचे जे आज उद्यां गेले, ते कायमचे गेले आणि राहिले ते मात्र स्वतः राहिले. त्यामुळें अधिक श्रमानें, अपयशामुळें मनांत ओशाळल्यानें व कधीं कधीं तर केवळ पश्चात्तापानें कांहीं मुलें अंथरूण धरतात! पण बेटे असा विचार करीत नाहींत कीं, "कालाचा अपव्यय, आयुष्याचा दुर्विनियोग, कर्तव्यपराङ्मुखता आणि आणखी ३६० दिवस सारखें सव्यापसव्य करण्यापेक्षां जर—

'चारी रेखेसी बोलांडावें। मुख्य निश्चयासी वहावें।
आणि धूर्तपणें असावें। जेथें तेथें ॥

या श्रीसमर्थांच्या 'कुबडी'चा आश्रय धरून आपण असतों तर आजचें, हें अपयश, हें ओशाळणें, आणि पश्चात्तापपूर्वक हें अंथरूण धरणें आपल्या कपाळीं कशाला येतें?"

---

३५५ Bhaidy

## ८ वर्तनक्रम.

काांहींही न करी कधीं, परि सदां बसे रिकामा घरीं;
आयुष्यव्यय जो करी पशुपरी रात्रंदिनीं भूवरीं;
कीर्ती सुंदरि त्याप्रती वश कधीं होणार नाहींच ती;
प्रेमाचा सुकटाक्ष लभ्य न तिचा त्या मंद भाग्याप्रती!

—'कीर्तिमंदिर' काव्य.

ज्यांच्यांत स्वावलंबन आहे, आत्मसंयमनाची ज्यांना संवय आहे, स्वकर्तव्याची ज्यांना चाड आहे, देहाचें सार्थक कशांत आहे हें जे जाणत आहेत आणि मरणाचें ज्यांना रात्रंदिवस स्मरण आहे ते आपला आयुर्व्यय म्हणजे 'वेळेचा' व्यय फारच चांगला करीत असतील यांत शंका नाहीं. परंतु सामान्यतः सर्व स्थितींतील लोकांनीं आपल्या 'वेळेचा व्यय' कसा करावा, याचा विचार येथें केल्यास तो अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' असें गीतावचन आहे. गुण आणि कर्मे यांच्या भेदाप्रमाणें मी चार वर्णांची उत्पत्ति केली आहे, असें श्री भगवान् म्हणतात, ते चार वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र होत. या चार वर्णांचा धर्म म्हणजे साधारणतः आयुःक्रम निरनिराळा सांगितला आहे. पण तो ज्या काळांत सांगितला आहे तेव्हांचा काळ व तेव्हांची परिस्थिति सांप्रतच्या काळापेक्षां व परिस्थितीपेक्षां

फारच भिन्न होती. सद्यःकालीं जातिधर्मानुरूप आयुःक्रम अजिबात बदलला आहे. एक शूद्र खेरीजकरून उद्योगधंद्यांच्या मानानें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य अगदीं एक झालेले आहेत, म्हटलें तरी चालेल. फार काय? पण म्लेंछ जे परकीय त्यांच्याही मांडीशीं मांडी लावून बसल्याखेरीज चालेनासें झालें आहे! कारण व्यवसाय भिन्न असेनात कां, पण ज्याअर्थीं तिन्ही वर्णांतील बहुतेक सर्वच लोक व्यवसाय करूं लागले आहेत आणि व्यवसायाखेरीज कोणाचेंही पाऊल पुढें पडेनासें झालें आहे, त्याअर्थीं सर्वच व्यवसायबंधु होत चालले आहेत! तेव्हां अशा परिस्थितींत मुख्य गोष्ट " वर्तनक्रम " तो कोणीं कसा करावा हें ठोकळ मानानेंच सांगणें बरें. पण योग्यताभावीं ती योग्यता बळेंच अंगीं आणूं पहाण्यापेक्षां समर्थाचा-आपल्या 'श्रीसमर्थांचा'च आश्रय करणें बरें. ते ह्मणतातः—

*प्रातःकाळीं उठत जावें । प्रातःस्मरण करावें ।
नित्यनेमें स्मरावें । पाठांतर ॥
मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट ।
बाष्कळपणाची वटवट । करूंची नये ।
धूतवस्त्रें घालावीं पिळून । करावें चरण क्षालन ॥
देवदर्शन देवतार्चन । यथासांग ॥
कांहीं फलाहार घ्यावा । पुढें व्यवसाय करावा ॥
लोक आपला परावा । ह्मणत जावा ॥
सुंदर अक्षर ल्याहावें । स्पष्ट नेमस्त वाचावें ॥

* This morning, like the spirit of a youth,
That means to be of note, begins by times.
—*Shakespear.*

विवर विवरोनी जाणावें । अर्थांतर ॥
नेमस्त नेंटकें पुसावें । विशद करून सांगावें ॥
प्रत्ययेवीण बोलावें । तेंचि पाप ॥
सावधानता असावी । नीति मर्यादा राखावी ॥
जनास मानेल ती करावी । क्रिया शुद्ध ॥
आलियाचें समाधान । हरिकथा निरूपण ॥
सर्वदां प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥
बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें ॥
वियोग पडोंचि न द्यावें । कथेमध्यें ॥
जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ॥
तरी महंतलीला स्वभावें । अंगीं बाणे ॥
सांग महंती संगीत गाणें । तेथें वैभवास काय उणें ? ॥
नभामाजीं तारांगणें । तैसे लोक ॥
अकलबंदी नाहीं जेथें । अवघेंची विस्कळित होतें तेथें ॥
एके अकलेवीण तें । काय आहे ?
घालूनि अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहूनि वाड ॥
तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटेपण ॥

त्याचप्रमाणें रामजोशांच्या कांहीं लावण्या व अनंतफंदीचे कांहीं फटकेही लोकमार्गदर्शक आरसे होत. पण विस्तारभयास्तव ते येथें देतां येत नाहींत. तथापि त्यांत जे कोणी आपल्या वर्तनाचें प्रतिबिंब सावकाश पाहून त्यांत दिसून येणाऱ्या दोषांस हद्दपार करतील तर त्यांनीं मात्र आपला 'वर्तनक्रम' चोख ठेविला असें सर्व कबूल करतील. पण रोजचे रोज आपलें आयुष्य किती कमी होत जातें, याचा विचार न करतां 'आतां किती वाजले?' एवढ्याच बुद्धीनें जे आपल्या खिशांतील सुंदर

घड्याळें काढून त्यांत ‘ वेळ ’ पाहतात, त्यांची फक्त कींवच करावी असें वाटतें. कारण घड्याळांचा खरा उपयोग फार निराळा आहे. सध्यां ज्याच्या त्याच्या खिशांत घड्याळें असून त्यांचे सुंदर छेडे मोठ्या ऐटीनें बाहेर सोडलेले अथवा लोळत असलेले दिसतात खरे, परंतु ज्या उद्देशानें तीं घड्याळें तयार करण्यांत आलीं व ज्या उद्देशानें तीं मुळींच उसंत न घेतां ‘ टिक टिक ’च्या रूपानें.—

“ काळ जातो क्षणक्षणां । मूळ येईल मरणा ॥
कांहीं धांवाधांव करी । जंव मृत्यु आहे दुरीं ॥
देह आहे जाइजिणें । भुललासी कोण्या गुणें ॥’

तसेंच आणखी—

“ अंतकाळ येतो येतां । तेथें नये चुकवीतां ॥
अकस्मात लागे जावें । कांहीं पुण्य आचरावें ॥ ”

याप्रमाणें आमच्या कानाशीं नित्यशः ओरडत असतात; तो उद्देश म्हणजे आयुष्याचा सद्व्यय करणें कितीकांचे हांतून सिद्धीस जात असेल व कितीकांचा ‘ वर्तनक्रम ’ सुधरत असेल हें एका परमेश्वरासच ठाऊक! तथापि सद्यःस्थिति पाहतां घड्याळाचा खरा उपयोग करणारा आमच्यामध्यें हजारांत–लाखांत एखादाच, असें म्हणण्यास हरकत नाहीं! तरी सुद्धां घड्याळावांचून ज्यांचें चालत नसेल त्यांनीं सुप्रसिद्ध बेंजामिन फ्रांक्लीनचा पुढील वर्तनक्रम पहावा:—

‘ सकाळीं निजून उठतांच मनाला पहिला प्रश्न—“ आज आपले हांतून कोणतें सत्कृत्य होण्यासारखें आहे ? ”

तास ६ ते ८—स्नान, पोषाख व ईशस्तवन. दिवसाचा कार्यक्रम व तो पार पाडण्याचा निश्चय चालू विषयाचें मनन. फराळ.

तास ८ ते १—उद्योगधंदा.

,, १ ,, २—वाचन, हिशेब व भोजन.

,, २ ,, ८—उद्योगधंदा.

,, ८ ,, ११-जेथील वस्तु तेथें ठेवणें. गप्पा गोष्टी, मनोरंजन व भोजन. दिवसांतिल कार्यक्रमाचा हिशेब. ईशस्तवन.

,, ११ ,, ६—झोंप.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, हा वर्तनक्रम बेंजामिन फ्रांक्लीनचा आहे. तेव्हां तो अमेरिकेंतील रीतिरिवाजास अनुकरून असल्यास नवल नाहीं. तथापि आमच्या वाचकांनीं तात्पर्याकडे नजर देऊन जर स्वतःच्या पारिस्थित्यनुरूप त्याचा उपयोग करून घेतला तर त्यांत त्यांचा फायदाच होईल. इतकेंच नव्हे तर याच महापुरुषाच्या कांहीं गोष्टी व मतें ठरल्यासारखीं असत; त्यांकडेही जर त्यांनीं विचारपूर्वक पाहिलें आणि तदनुरूप वागण्याचा परिपाठ ठेविला तर ‘ दुधांत साखर ’ पडल्य.सारखी होईल. त्या गोष्टी ह्या—

१ आहार बेताचा असावा.

२ भाषण थोडें, हितकर व गोड असावें.

३ ज्या वेळीं जें करावयाचें त्याच वेळीं तें करणें.

४ विनाकारण खर्च न करणें व प्रसंगविशेषीं करणें भाग पडल्यास शिल्लक ठेवून करणें.

५ वेळेचा दुरुपयोग न करणें.

६ विश्वासघात न करणें. सर्वांशीं मोकळ्या मनानें वागणें.

७ दुसऱ्याचें नुकसान न करणें. झाल्यास त्याचा फायदा करून देणें.

८ अतिप्रसंग न करणें व दुसऱ्यानें जरी आपलें नुकसान केलें तरी तें विसरणें.

९ शरीर, वर्तन, मन व वस्त्र नेहमीं स्वच्छ ठेवणें.

१० हलक्या गोष्टीनें आपलें मन दुखवून न घेणें आणि जी हानि अथवा गोष्ट व्हावयाचीच तिचा खेद न करणें.

११ परमेश्वरास नेहमीं भजणें.

ह्याचप्रमाणें धी आनरेबल मि. स्टीफन् ॲलन यांचीही कांहीं बोधवाक्यें आपल्या हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखीं आहेत. तीं हीं:—

१ वचनांत फारसें गुंतूं नये.

२ नेहमीं खरें बोलावें.

३ परनिंदा करूं नये.

४ सत्संग धरावा.

५ आपण बरें कीं, आपलें काम बरें.

६ नशीबावर हवाला ठेवून बसूं नये.

७ मादक पदार्थ सेवूं नये.

८ सद्वर्तन सर्वांत श्रेष्ठ होय.

९ आपलें रहस्य आपले जवळच ठेवावें.

१० उसनवारी म्हणजे कर्ज करूं नये.

११ बायकोचें पोट भरण्याइतकी योग्यता आल्याखेरीज लग्न करूं नये.

१२ दैवाची अनुकुलता दिसली तरी घाईनें श्रीमंत होण्याची हांव धरूं नये.

१३ आद्यांपेक्षां खर्च कमी करावा.

१४ तारुण्यांतच दोन पैसे मागें टाकावे ( सांचवावे ).

१५ भलतीकडे मनाचा ओढा उपयोगीं नाहीं.

१६ थोडथोडी कां होईना? पण शिल्लक ठेवावी. हळूं-हळूं तीच मोठी होते.

१७ सत्संग व सभ्यपणा पुण्यमंदिराचे खांब होत.

१८ बिघडविल्याखेरीज आपलें वर्तन बिघडत नाहीं.

१९ दुसऱ्यानें आपल्यास नांवें ठेविलीं तर त्याला आपण आपल्या सद्वर्तनानें लाजवावें.

२० निजतांना दिवसाचे कामाचा विचार करावा.

२१ आळस टाकावा. हातानें चांगलें काम होत नसल्यास निदान मन तरी चांगल्या कामीं लावावें अथवा सुविचारांत गुंतवावें.

येवढ्यावरून ' वर्तनक्रम ' कसा असावा हें ज्याचें त्याला सहज कळण्यासारखें आहे. म्हणून सध्यां इतकेंच पुरें करूं व पुढें जराशी ' विश्रांती ' घेतां आली तर पाहूं.

## ९. विश्रांती.

Here all things in their place remain,
As all were ordered, ages since,
Come, care, and pleasure, hope and pain,
And bring the fated fairy prince
—*Tennyson.*

आतांपर्यंतच्या विवेचनावरून उद्योग करणें चांगलें, त्यास अनुसरून वर्तनक्रम ठेवणें योग्य व अशा रीतीनें 'वेळेचें महत्व' प्रत्येकानें जाणणें अवश्य हें सिद्ध झालें खरें. परंतु रात्रंदिवस उद्योग करणें अथवा अति मेहनत करणें चांगलें नाहीं हें विसरतां कामा नये. थकून गेल्यावर, शरीराचीं गात्रें शिथिल झाल्यावर, डोळ्यांत रक्त उतरल्यावर आणि दमानें छाती भरून आल्यावर सुद्धां उद्योग करणें अथवा इतकी स्थिति येईपर्यंत मेहनत करणें मुळींच इष्ट नाहीं. अशानें शरीराचा नाश होतो. कारण अती तेथें माती हा सिद्धांत आहे. एका कवीनें म्हटलें आहे कीं:—

'साजेल तेंचि ल्यावें गड्यानों ? पचेल तेंचि खावें ! 'इह लोकीं परलोकीं जनामधिं म्हणुनि घ्यावें; ॥' सारांश कोणतीही गोष्ट अमर्याद उपयोगीं नाहीं. Too goodness is too worst अशी इंग्रजींत एक म्हण आहे; तिचा तरी अर्थ असाच आहे कीं, अति चांगुलपणा सुद्धां फार वाईट. सोन्याची सुरी झाली तरी ती उरांत खुपसून घेणें चांगलें होईल काय? नाहीं. तसें केल्यानें रक्तपात होईल. कदाचित् मृत्युही

येईल. तोच परिणाम शक्तीबाहेर काम करण्याचा. अन्न जसें तारक आहे तसें मारकही आहे, तद्वत् कामाचीही गोष्ट आहे. ह्मणून उद्योगशील मनुष्यानें उद्योगमग्न असणें जरी चांगलें आहे—अवश्य आहे—तरी त्याला मर्यादा आहे.

ही मर्यादा म्हटली म्हणजे विश्रांति होय. कामानंतर मनुष्याला विश्रांति अवश्य पाहिजे आणि ईश्वरी योजनाही पण तशीच आहे. दिवस हा उद्योगधंद्यासाठीं आणि रात्र ही विश्रांतीसाठीं त्या दीनदयाळ प्रभूनें निर्माण केली आहे. सारा दिवस कामाच्या रगाड्याखालीं मानवी प्राणी थकून जातात. तेव्हां त्यांना आपला थकवा भागविण्यासाठीं शरीराला, रक्ताला व मनाला विश्रांति द्यावीशी वाटणें साहजिक आहे. आणि असेच लोक—नित्यव्यवसायी लोक अंथरुणावर लवंडा तांच इहलोकचे अखिल व्यवहार सोडून गाढनिद्रेचें सुख पूर्ण अनुभवितात. आणि सुखाचा खरा ठेवा हाच आहे. निद्रा ही ईश्वराची मोठी देणगी आहे. ह्या देणगीनें श्रमाचा परिहार जसा होतो, तसा तो कशानेंही होत नाहीं. तथापि तिचा सुद्धां प्राणिमात्रावर नियमितच अंमल असलेला दिसतो. सात आठ तास सडकून झोंप झाली कीं, आदले दिवशीं थकला भागलेला मनुष्य दुसरे दिवशीं उद्योगधंदे किंवा काबाडकष्ट करण्यास पुन्हां ताजातवाना होतो. आणि ते करण्याची त्याला हुरूपही तशीच येते.' तेव्हां दिवस आणि रात्र व काम

---

Weariness.  
Can snore upon the flint, when resty sloth  
Finds the down pillow hard.

—*Shakespeare.*

आणि विश्रांती ही योजना पाहिली म्हणजेच एक गोष्ट आपोआप सिद्ध होते आणि ती मर्यादा ही होय. दिवस घ्या अथवा रात्र घ्या. त्यांची मर्यादा तीस तीस घटकांची सामान्यतः आहे. तद्वत् उद्योगधंद्याला व कामकाजालाही व्यक्तिविषयक परिस्थित्यनुरूप फार–फार झालें तर तीस घटकांपर्यंतच मर्यादा असूं शकेल. या मर्यादेच्या बाहेर जो पाऊल टाकील, तो अतिरेकी होईल. समर्थ म्हणतातः—

> कांहीं गलबला कांहीं निवळ । ऐसा कंठित जावा काळ ॥
> तेणें करितां विश्रांति वेळ । आपणांस फावे ॥

यावरून कामानंतर विश्रांति पाहिजे हें उघड आहे. परंतु नुसत्या विश्रांतीचीच अपेक्षा करणें आणि उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष करणें कधींही श्रेयस्कर होणार नाहीं. मनुष्य रात्रंदिवस विश्रांतीच घेऊं पाहील अथवा घेत राहील तर तो आळशाप्रमाणें 'खायाला काळ व धरणीला भार' होऊन राहील. विश्रांतीची खरी योग्यता, तिचें खरें महत्व आणि तिचा खरा उपयोग त्यास कळणार नाहीं. उलट तो आळशी होऊन सर्वांच्या तिरस्कारास व अपमानास पात्र होईल. कदाचित् तो श्रीमंत असला तर पैसे आहेत तोंपर्यंत काहीं मतलबी व तोंडपुजे लोक स्वार्थासाठीं त्याची स्तुति करतील व खुषमस्कऱ्याप्रमाणें त्याची मर्जी संपादन करून घेतील. पण त्याची ती श्रीमंती लयाला गेल्यावर तेच मतलबी व तोंडपुजे लोक त्याची निर्भत्सना व अपमान त्याचे तोंडावर करतील! असो; तेव्हां विश्रांति म्हणजे आळस नव्हे. कसून

काम केल्यावर थकलेल्या मनाला व शरीराला जो विसावा मिळतो, त्याचें नाव विश्रांति. श्रमानें तर तिची योग्यता जशी कळते तशी एरव्हीं कधींही कळत नाहीं. रखरखीत अरण्यांतून सुंदर उपवनांत गेल्यावर तेथील रमणीयतेची, उन्हांतून लांबवर चालून आल्यावर सावलीची, तहान लागल्यावर थंडगार पाण्याची आणि भूक लागल्यावर अन्नाची जशी योग्यता कळते, तशी श्रमानंतर विश्रांतीची योग्यता कळते. अशी विश्रांति घेणें म्हणजे 'वेळेचें महत्व' कमी करणें नव्हे. उलट वाढविणें आहे. समुद्राच्या लाटा गिरिकंदरांशीं रममाण होतांना स्वच्छेनें नाचतात, उडतात व बागडतात आणि आपल्यास गिरिकंदर जसा कांहीं धरावयास येतो, अशा मिषानें त्या झुरकन परत पळून जातात. पण पुन्हां त्या कामुक होऊन जशा कांहीं त्याचे बरोबर क्रीडा करतात आणि श्रांत झाल्यावर पुन्हां परत जातात; तद्वत् श्रमाला विश्रांति असणें अवश्य आहे आणि विश्रांतीचे मागून श्रमही अवश्य होत! या विश्रांतीचे दोन प्रकार आहेत. एक शारिरीक व दुसरी मानसिक. पहिली झोंपेनें, अंग रगडून घेतल्यानें, मनाला खरा आनंद होण्यासारखे खेळ खेळण्यानें अथवा दुसऱ्या कांहीं उपायानें मिळते. परंतु मानसिक विश्रांतीचें तसें नाहीं. विश्रांतीची सर्व रात्र व दिवसाचा कांहीं नियमित भाग केवळ झोंपेंत जाणें अशक्य आहे. म्हणून झोंपेची वेळ खेरीज्करून बाकी जो वेळ विश्रांतीचा म्हणून राहतो, त्याचा विनियोग सामान्यतः दोन तऱ्हेनें होतो:—

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्
व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥

धीमंतांचा काल ‘ काव्यशास्त्रविनोदां ’त जातो. व मूर्खांचा काल व्यसन, निद्रा किंवा तंटेबखेडे यांत जातो !

पैकीं पहिल्या प्रकारच्या कालक्रमणांत शरीराबरोबर मनाची वाढ होऊन तें गंभीर होतें व दुसऱ्या प्रकारच्या कालक्रमणांत मनाला भलतेंच वळण लागून त्याबरोबर तामसपणा अधिक वाढतो.

कित्येक महात्म्यांनीं उद्योगधंद्यांत जाणाऱ्या वेळेपेक्षांही विश्रांतीच्या ‘वेळेचें महत्व’ फारच मोठें मानून, त्याचा व्यय त्यांनीं नवीन शोध लावण्यांत, मोठमोठे ग्रंथ लिहिण्यांत, सार्वजनिक सुखाच्या नानाविध सोई काढण्यांत, अनेक उपयुक्त संस्था स्थापन करण्यांत आणि लोकमत प्रबल करून तद्वारा सारें जग हालवून सोडण्यांत केला आहे ! होमर, व्यास; शेक्सपीयर, कालिदास; नेलसन, टोगो; गालिलियो, भास्कराचार्य; ग्लॅडस्टन, दादाभाई; आरिस्टाटल, विवेकानंद; स्पेन्सनर, न्या. रानडे; मॉझिनी, ग्यारिबॉल्डी; साक्रेतीस, तुकाराम; वगैरे अनेक महात्म्यांनां आपल्या विश्रांतीचा वेळ राष्ट्राच्या सुखसंवर्धनार्थ खर्च केलेला आहे व जे आमच्या पूर्व सुकृतबलानें आज आमच्यांत असून आमच्या हिताकरताच केवळ अंतःकरणपूर्वक झटत आहेत, अशीं उदाहरणें आणखी कितीतरी देतां येतील ! तथापि नित्य व्यवसाय

करीतच केवळ आयुष्याचे दिवस काढणें यांत विशेष असें कांहींच नाहीं. मात्र.—

‘ मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीसीं सादर व्हावें ॥
मरोनि कीर्तिस उरवावें । येणें प्रकारें ॥
नेमकच्णें वर्तो लागला । तो बहुतासि कळों आला ॥
सर्व आर्जवी तयाला । काय उणें ? ॥

अशा रीतीनें स्वतःला लोकादरास पात्र करून घेणाऱ्या विभूति फार थोड्या ! कारण विश्रांतीच्या वेळेचा सदुपयोग करून स्वतः बरोबर समाजाची किंवा राष्ट्राची उन्नति करून दाखविणें सामान्य नव्हे. सारांश, विश्रांतींतही राष्ट्रोपयोगीं किंवा लोकोपयोगीं कृत्यें करतां येऊन पुन्हां विश्रांतिसुख अनुभवितां येतें.

---

## १० उपसंहार.

O star of strength! I see thee stand,
And smile upon my pain;
Though beckonest with thy mailed hand,
And I am strong gain.

—*Longfellow*

बोलतां बोलतां हा निबंध बराच लांबला आणि वाचकांचा वेळही आम्हीं बराच घेतला. आतांपर्यंत ‘ वेळेचें महत्व ’ याविषयाचें जें प्रतिपादन करण्यांत आलें तें त्यांस कितपत आवडलें असेल हें सांगवत नाहीं. कारण त्यांत विषयाची मांडणी व विवेचनशैली जशी असावी तशी नाहीं, हें आम्ही कबूल करतों. ती ज्यांस साधली असेल अथवा

ज्याच्या हातचा ती मळ होऊन बसली असेल ते याच विषयावर अति सर्वोत्कृष्ट निबंध लिहूं शकतील. पण तसा प्रयत्न फारसा झाल्याचें आढळण्यांत न आल्यामुळें सुचले ते विचार येथें प्रदर्शित करण्यांत आम्हीं आळस केला नाहीं. वस्तुतः 'वेळेचें महत्व' हा विषय मोठा आहे, मनोरम आहे आणि महत्वाचा आहे. शाळेंतील विद्यार्थ्यांपासून तों राष्ट्राच्या अधिपतिपर्यंत सर्व प्रकारच्या व दर्जाच्या लोकांस तो उपयुक्त आहे व आवडता आहे. चंदनाचें झाड! तें कितीही घांसलें तरी त्याचा सुगंध जसा कमी होत नाहीं, तद्वत् या विषयाचें कितीही विस्तारपूर्वक विवेचन केलें तरी तें नकोसें होणार नाहीं. परंतु अनुभव असा आहे कीं नुसतें मिष्टान्न खा खा खाऊनही पुढें तें कित्येकास नकोसें होतें. तद्वत् या विषयाचें विस्तारपूर्वक विवेचनही आमचे वाचकांस येरंडाचें गुऱ्हाळ वाटण्याचा संभव आहे. तथापि चंदनाचे सुवासानें मन प्रसन्न होतें तसें या निबंधवाचनानें होईल कीं नाहीं हें सांगवत नाहीं. कारण लेखकाचे अंगीं तितकी पात्रता नाहीं हें वर सांगण्यांत आलेंच आहे. म्हणून उपसंहारात्मक दोन शब्द सांगून वाचकांचा सप्रेम निरोप घेणें बरें!

निबंधारंभीं आम्हीं असें म्हटलें आहे कीं आजकाल देशजागृतीचीं चिन्हें चहूंकडे दिसत आहेत. ही जागृती कायम राहील तर आपल्या राष्ट्राचें दैन्य लौकर फिटेल. दृढनिश्चयपूर्वक घोर तपश्चर्या करून भगीरथानें स्वर्गंगा भूतलावर आणून पूर्वजांचा उद्धार केला तद्वत् आपल्यांतील प्रत्येकानें

भगीरथ होऊन अथवा भगीरथप्रयत्न करून पश्चिमवाहिनी द्रव्यगंगा पूर्ववाहिनी करून तिला आपल्या हिंदुस्थानांत आणून अवघ्या राष्ट्राचा उद्धार करणें योग्य आहे. हिला आपल्या राष्ट्रीय जागृतीचे दांडगे ओढे व दिव्य नद्या मिळाल्या म्हणजे त्या सर्वांस आपल्या कर्तव्यपरायणतेच्या लाटा येतील. पण हीं कामें झोंप घेऊन होत नसतात अथवा चौचा आंकडा घालून लोडाशीं टेंकून बसल्यानें होत नसतात. प्रत्येकानें आपल्या आयुष्याची घटिका कर्तव्य करण्यांत घालविली पाहिजे. ती घटका जो व्यर्थ दवडील त्याचेसारखा अभागी कोणी नाहीं. या जगांत सर्व कांहीं मिळणें शक्य होऊं शकेल. पण गेलेला प्राण व व्यर्थ दवडलेली वेळ कधींही परत येऊं शकत नाहींत. एकानें म्हटलेंही आहे कीं:—

> संपत गई ते सांपडे, ॥ गया वळे छे व्हाण ॥
> गत अवसर आवे नहीं ॥ गया न आवे प्राण! ॥

आयुष्यरूपी धनाचा जो आपण व्यय करतों तो विनाकारण करूं नये. त्याचा यथार्थ विनियोग करण्यांत औदार्य शोभेल. पण अयथार्थ विनियोगांत आपण कृपणापेक्षां कृपण झालें पाहिजे. लहानथोर, विद्वान् अविद्वान्, गरीब श्रीमंत, आणि स्त्री व पुरुष या सर्वांनीं 'वेळे'चें म्हणजे 'आयुष्या'चें 'महत्व' लक्षांत आणून कर्तव्यपरायण झालें तरच जागृतिरूपीं महानदींत स्नान करून नरदेहाचें सार्थक होईल. प्रस्तुतची लाट अशी विलक्षण आहे कीं तिच्या अलोट

स्नानानें आत्मोन्नती व राष्ट्रोन्नती एकसमयावच्छेदेंकरून होणें शक्य आहे. परंतु राष्ट्र हें व्यक्तींनें बनलेलें असतें आणि व्यक्तींत आत्मा अधिष्ठित असतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे. या करितां प्रत्येकानें आत्मोन्नती करतांना 'वेळेच्या महत्वा'चा मोठाच विचार केला पाहिजे कारण जगांत—या नश्वर जगांत—आयुष्या इतका 'महत्वा'चा दुसरा प्रश्न नाहीं. करितां मित्रहो, उठा! अज्ञानरूपी निद्रेचा त्याग करा! आणि परिस्थितीचें यथार्थ ज्ञान करून घेऊन सभोंवार काय चाललें आहे हें डोळे उघडून पहा! अहो, प्रस्तुतची जागृति,-सार्वत्रिक जागृति—हा एक रत्नाकर समजा. व त्यांत बुडी मारून वाटतील तीं व सांपडतील तेवढीं रत्नें काढा. या रत्नाकरांत चौदा विद्या आहेत, चौसष्ट कला आहेत, स्वाभिमान आहे, देशप्रीति आहे, व्यापार आहे, धंदा आहे, धन आहे, द्रव्य आहे, सुधारणा आहे, भरभराट आहे, स्वातंत्र्य आहे, सर्व आहे! आणि सुदैवानें तो रत्नाकर सध्यां तुमच्या पुढें आहे. तुह्मांला 'तुमचें' तें हवें आहे, आणि तें सर्व त्यांत आहे. सारांश, अभाग्याचे घरीं जशी कामधेनु यावी, तशी प्रस्तुतची ही 'स्वदेशी' कामधेनु आपण होऊन तुमच्या राष्ट्राच्या उत्कर्षार्थ तुम्हांकडे धांवत आली आहे! अशा वेळीं तुह्मी जर तिला हांकलून बाहेर घालवाल, तुम्ही तिच्या पालनपोषणांत अंतर कराल-निव्वळ आळस कराल—तर?—तर? हाय! पण अशावेळीं आम्हीं आपले ओंठ हलविण्याऐवजीं श्रीसमर्थांचाच आश्रय करणें बरें! ते म्हणतातः—

Marathi Granth Sangrahalaya Thana



कष्टेविण फळ नाहीं । कष्टेविण राज्य नाहीं ॥
केल्याविण होत नाहीं ॥ साध्य जनीं ॥
आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ॥
कष्टांकडे चुकविते । हीन जन ॥
आधीं कष्टाचें दुःख सोशिती । ते सुखाचें फळ भोगिती ॥
आधीं आळसें सुखावती । त्यांसीं पुढें दुःख ॥
जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून गेले ॥
येर ते बोलतची राहिले । करंटे जन ॥

बांधवहो! ही वेळ नुसती बोलण्याची नव्हे अथवा पोकळ गप्पा मारण्याचीही नव्हे, तर 'वेळेच्या महत्वा' कडे लक्ष देऊन ज्यावेळेचें काम त्याच वेळेस करण्याची ही वेळ आहे. त्यांत उद्यां परवां करून उपयोग नाहीं. कारण—

कल करता सो आज कर, आज करना सो अब ।
अवसर वित्या जात है, फेर करेगा कब ? ॥

जें काम तुम्ही उद्यांवर टाकतां तें आज करा आणि जें आज करण्यासारखें असेल तें आतांच म्हणजे ताबडतोब करा. कारण वेळ निघून गेल्यावर मग तें तुम्ही केव्हां करणार? असा प्रश्न एक मार्मिक कवी करीत आहे. त्याचें उत्तर कोण कसें देणार? ही वेळ केवळ कृति करून दाखविण्याची आहे. तुमचा देश परतंत्र झाला, तुमचे उद्योगधंदे ठार बुडाले आणि पुस्तकी विद्येंत तुम्ही तरबेज होत चाललां; अशा स्थितींत तुम्ही स्वतः हालचाल केल्याशिवाय, तुमच्यांतील प्रत्येकानें 'वेळेचें महत्व' जाणल्याशिवाय, आणि दृढनिश्चयपूर्वक बोलल्याप्रमाणें आचरण केल्याशिवाय तुम्हांला कधींही चांगले दिवस येणार नाहींत. आज पृथ्वीच्या

पाठावर ज्या अनेक सुधारणा झालेल्या तुम्ही पाहतां व खुद्द हिंदुस्थानांतच रेल्वे, तारायंत्रें, टपाल, गिरण्या, ट्राम, विद्युद्दीप आणि शेंकडोंशें इतर कारखाने निघालेले पाहतां ; हें कां एका विशिष्ट सरकारच्या कारकीर्दीचें फळ आहे काय ? नाहीं. हीं फळें आपली महत्वाची वेळ सत्कारणीं लावणाऱ्या महात्म्यांच्या उद्योगवृक्षाचीं होत. हे उद्योगवृक्ष म्हणजे कल्पतरु होत. ते वाटेल त्या देशांत वाटेल त्या काळांत उगवतात. त्यांना पंचमहाभूतांची भीति नसते. कसाहि मुसळधारी पाऊस पडला तरी ते बुडत नाहींत. सूर्यानें बारा डोळे उघडले तरी ते जळत नाहींत. आणि प्रळयकाळचा झंझावात जरी सुटला तरी ते उलथून पडत नाहींत ! उलट जों जों त्यांस तुम्हीं उद्योगाचें खत घालाल, सत्कालक्षेपाचें त्यांस पाणी द्याल आणि 'बोले तैसा चाले'च्या सुंदर कातरीनें त्यांस सुटसुटीत कराल, तों तों ते वृक्ष अधिक जोमदार होतील ; त्यांचीं पाळेंमुळें खोल व दूरवर जातील आणि उद्योगधंद्याचे भरभराटीनें राष्ट्रोत्कर्षाचीं त्यांस सुंदर फळें येतील. पण हें उद्योगवृक्ष लावण्याचें, त्यांस गवत वगैरे घालून वाढविण्याचें आणि नंतर त्यांच्या गोड फळांचा मधुर आस्वाद घेण्याचें तुमच्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या हातीं आहे हें लक्षांत ठेवा. तुकाराम महाराज म्हणतातः—

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥

समाप्त.

# वेळेचें महत्व.

## परिशिष्ट.

# जीवितसार.

### फटका.

नका गड्यांनों म्हणूं तुम्ही हो " वांचुनी नाहीं फळ कांहीं—"
उद्योगाला विमुख असे नर, जिवंतही तो मृत पाहीं ॥ ध्रु० ॥
असार जरि या भासति वस्तु, आहे सार तयामाजीं—
इह लोकींचें जन्म नका रे, दवडूं वायां, व्हा गाजी !
माया नोहे तत्व असे हें, खरें सांगतों परिसा जी !
"आपण मेलों, लोक बुडाला," ऐसें म्हणती ते पाजी !
देहा त्यजुनी गेलीं जरि तीं, मिळलीं होतीं भूतें जीं,
अखंड आत्मा नित्य राहतो, सत्कर्माला व्हा राजी;
सुखदुःखाचा केवळ अनुभव, घ्याया जीव दिला का जी ?
( चाल ) प्रभुची इच्छा ही नाहीं, प्रसन्न तो सत्कर्माहीं;
भजा तयाला लवलाहीं, स्नान करा नयपरिवाहीं,—
दिवसें दिवसें सुकृतें जोडा, बरवी यापरि गति नाहीं ॥
नका गड्यांनों ! म्हणूं० ॥ १ ॥
आयुष्याचा काल चालला, अझुनि डोळे उघडांना,
करणें आहे विहित किती तें ? अगाध शास्त्रें तीं नाना ?
शक्ति अतुलही आहे अमुची, धरूं नका या अभिमाना,
कृतांत दूती जरा न कळतां, धरुनि जाइल अवसाना !
उठा गड्यांनों ! लवकरिं खालीं, घालुनि बसतां कां माना ?
तुम्हां न हें हो साजे, साजे—गतानुगतिकां इतरांना !
संसाराच्या समरीं ठाकुनि उभे दंड कां ठोकांना ?

( चाल ) " पुढचा येइल काळ बरा, " आणा मनिं तरि मोह खरा !
गेल्याचा नच शोक करा, गेलें सारें तें विसरा !
आतां खटपट करा, असूंद्या, मन आणि प्रभु हे ग्वाही.
नका गड्यांनों म्हणूं० ॥ २ ॥

थोर पुरुष जे होउनि गेले त्यांचीं चरितें बोधवितीं—
सर्वांनाही करितां येइल अल्पायासें थोर मति,
घेतां येइल सत्पथ; तेणें-पुढचे जातिल लोक किती !
संसारार्णव कल्लोलांहीं विक्लव होती पुरुष अति,
सत्पथ नौकेमाजीं बसुनी दुस्तर सागर हा तरती,
धैर्यें भारी विघ्नें पळतीं, अंतीं लाभे साधुगति,
थोरांचा हा महिमा गाती, प्रेमें सत्कवि करुनि कृति.
( चाल ) उत्साहानें कर्म करूं, यश देणारा प्रभु स्मरूं;
सिद्धि न होतां धैर्य धरूं, विघ्नें तो जगदीश हरूं !
आपण अपुलें कर्म करावें, चिंता सारी प्रभु वाही.
नका गड्यांनों ! म्हणूं० ॥ ३ ॥

विष्णु मोरेश्वर महाजनी.

---

# उद्यांचा काय नेम ?

### श्लोक.

तुझीया मनीं चांगलें व्हावयाचें
तरी आज हो; पर्व हें सोनियाचें !
असे वागले मोठमोठे शहाणे;
उद्यां काय होईल तें कोण जाणें ?' १
धरित्रीवरी काल जीत ठेले
तयांतील पाहा किती आज मेले !
तुला ही अवस्था नको का वहाणें ?
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? २

पुढें हें करूं, तें करूं, पुण्य साधूं,
धनें मेळवूं, मंदिरें थोर बांधूं,
भ्रमीं वेड या शुद्ध आहे रहाणें;
उद्यां काय होईल तें कोण जाणें ? ३
दरिद्री, मुके, आंधळे पाहतोसी;
असे नेम कां कीं तसा तूं न होसी ?
अकस्मात् ये हें जिणें दीनवाणें;
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? ४
नसे आळसासारखा चोर लोकीं,
अमोलीक आयुष्य तो चोरतो कीं !
'उद्यां हो उद्यां' हे तयाचे बहाणे,
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? ५
म्हणूनी तुला वाटतें जें करावें
करायास तें **आज** बा लाग भावें
दुजा आजच्या सारखा वेळ नाहीं
विचारूनि चित्तीं खरें काय पाहीं ! ६

**विनायक कोंडदेव ओक.**

---

# कालक्षेप

## श्लोक.

नरतनू अति दुर्लभ यास्तव ?, हरिहरां, त्यज सर्व भयां, स्तव.
उकलली न बसेल पुन्हां घडी । फुकट तूं दवडीं न कधीं घडी १
जंव तुला जडली न जरा महा । तंव नरा! भज रे भज राम हा;
न कळतां यम घालिल रे उडी । फुकट तूं दवडीं न कधीं घडी. २
बघुनि साधु भवांबु तरे कसा । शरण जाउनि त्या उतरे कसा;
भवनदींतुनि दाविल तो थडी । फुकट तूं दवडी न कधीं घडी ३

भरंवसा न धरी घडिचा पहा । कठिण मृत्यु गळ्यावरि चाप हा;
म्हणुनि शीघ्र उठे करि तांतडी । फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ४
हित तुझें समजे न कसें तुला । शरण जाइ भवार्णव-सेतुला;
सतत सत्कविवाक्सुमनें खुडीं, । फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ५
निशिदिनीं बहु भूतदया वरी । सुकृतधी ठसवी हृदयावरीं;
हरिकथामृत पाहुनि दे बुडी । फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ६
भवनदींत महा कलि भोंवरा, । मजशिं उद्धरि देइं विभो ! वरा;
विनविं हेंच करीं हरि सांगडी, । फुकट तूं दवडीं न कधीं घडी! ७
करि सदां उपकार जनांवर, । न करि तो मतिमंद; जनावर;
तुजसवें नच येइल ही कुडी । फुकट तूं दवडी न कधीं घडी. ८
पथिक दीनजनां करि सोय रे । तरि तुझे जन विश्वहि सोयरे;
सुगति कीर्ति तुला मग रोकडी । फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ९
झटुनि निस्पृह उद्यम कीं करीं । मग रमा सहजीं तव किंकरी;
निजयशें जगतीं चढवी गुडी । फुकट तूं दवडीं न कधीं घडी. १०

**कृष्णाजी नारायण आठल्ये.**

## आर्या.

आयुष्य क्लृप्त असुनी, क्षणक्षणीं तें लयास जात असे,
व्यर्थचि तद्व्यय करिती, पुष्कळ दिसती विचारशून्य असे.

**राजा सर टी. माधवराव.**

## आर्या.

जिंकुनि विवेकखड्गें, आलस्य प्रथम शत्रु घातकर,
वा कीर्तिश्री जोडुनि, त्रैलोक्यामाजि धन्य तात कर !

**शिवराम रामकृष्ण नित्सुरे.**

# शुद्धिपत्र.

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ९ | १४ | करित | कीरत |
| १० | ७ | लाक्षणीक | लाक्षणिक |
| १३ | १४ | समजून | समजूत |
| २३ | १ | आळस | उद्योग |
| ,, | ११ | विद्यार्थीदर्शेत | विद्यार्थिदर्शेत |
| २५ | २ | स्वालंबनाच्या | स्वावलंबनाच्या |
| ,, | ९ | केऽन | केन |
| २७ | २० | स्वार्थैकदृष्ट | स्वार्थैकदृष्टि |
| २९ | ३ | उद्योगान | उद्योगानें |
| ३१ | २३ | becams | beams |
| ३३ | १८ | अंकूर | अंकुर |
| ४४ | २३ | विराजामान | विराजमान |
| ४८ | २ | भनुष्याचे | मनुष्याचे |
| ५२ | २ | श्रोतं | श्रोत्रं |
| ५२ | ३ ... | ... ... ... | दानधर्मानें हात शोभतात कंकणानें शोभत नाहींत. |
| ,, | १९ | देशाची | लोकाची |
| ५४ | ९ | चतुर्भूज | चतुर्भुज |
| ५६ | २२ | वीरवती | वीर्यवती |
| ५७ | १६ | कर्तव्यपरांगमुखतेनें | कर्तव्यपराङ्मुखतेनें |
| ७१ | ११ | स्वच्छेनें | स्वेच्छेनें |
| ७८ | १३ | उद्योगाचें खत | निश्चयाचें खत |

ESTABLISHED 1880.


INDIA'S HEAD QUARTER for WATCHES, CLOCKS and TIME-PIECES &c.

AWARDED Gold Medals and Honored Diplomas

Suppliers to

SEVERAL GOVERNMENT DEPARTMENTS and STATES IN INDIA.

G. B. NAIK & Co., BOMBAY.




ASK FOR GOOD HONEST TIME-KEEPER.

You will find in our long standing establishment a choice selection which has emanated from the best and popular Factories in the world.

**Give us the opportunity to "WATCH" you.**

While ordering please state kind class and approximate price &c. of articles required.

**Illustrated Catalogue free.**

G. B. NAIK & Co., BOMBAY.

# टेबल टाइमपीसेस.



“ बी ”—२ इंच डायल रोजच्या चावीचें किं. रु. २।=, अलार्मचें किं. रु. ४॥, प्रीन्सेस किंवा ट्र्यांझिटः ४ इंच डायल रोजच्या चावीचें किं. रु. २॥. अलार्मसह किं. रु. २॥।= तारीखसह किं. रु. ३।. लाँग अलार्मः—१५ मिनीट सारखें अलार्म होणारें किं. रु. ५॥ते ६. पोनी किंवा नट-मेग—रोजचे चावीचें डायल २ किंवा ३ इंच किं. रु. २॥।. येको—४ इंच डायल रोजच्या किल्लीचें किं. रु. २॥।. अलार्म-सह किं. रु. ३.

कॉटेजटाइमपीसः—लांकडी चौकोनी, रोजच्या चावीचें, ६ इंच डायल, उंची १२ इंच किं. रु. ३॥, अलार्मसह किं. रु. ४॥. तास वाजणारें किं. रु. ५॥. तास व अलार्मसह किं. रु. ६. वाजा वाजणारें टाईमपीस—धातूचें किं. रु. ५ते ६. प्याकिंग, पोष्टेज वगैरे खर्च निराळा.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई आणि पुणें.